RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

**प्रकाश आंबेडकरांकडून तिसऱ्या आघाडीची पुन्हा घोषणा**
**विधानसभेत कोणालाही पाठिंबा नाही**
पान 2 पाहा

# मराठी अक्रॉस मुंबई

संपादक- संजय मंगेश भैरे

**मराठा समाजाच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री शिंदेंसोबत बैठक**
**ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही : शंभूराज देसाई**
पान 3 पाहा

वर्ष: ९ अंक : ४३ ■ मुंबई, मंगळवार २४ ते ३० सप्टेंबर '२४
मूल्य - ५.०० रुपये पाने - ८

## बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा एन्काऊन्टर

**मुंब्रा**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काऊंट केल्याची माहिती समोर आली आहे. अक्षय शिंदे याला पोलिसांनी अटक केली होती. तो तळोजा कारागृहात होता. बदलापूर पोलिसांकडून क्राईम ब्रांचकडे दिले जात असताना अक्षय शिंदे याने पोलिसांची बंदूक हिसकावून गोळ्या झाडल्या. त्यानंतर पोलिसांनी स्वरक्षणासाठी त्याचा एन्काऊंटर केल्याची माहिती पुढे येत आहे.



अक्षय शिंदे याने पोलीस अधिकाऱ्याच्या पायावर गोळ्या झाडल्या. त्यानंतर आत्मसंरक्षणासाठी पोलिसांनी गोळीबार केल्याची माहिती आहे. या प्रकरणात अक्षय शिंदेचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. पोलिसांकडून अक्षयचा एन्काऊंटर करण्यात आला आहे. बदलापूरमधील या घटनेने लोक रस्त्यावर उतरले होते. लोकांनी मोठे आंदोलन केले. रेल्वे गाड्या रोखून धरल्या होत्या. आरोपीला फाशी देण्याची मागणी लोकांनी केली होती. त्याच्यावर दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप होता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अक्षय शिंदे याने आधी गोळी झाडली. त्याने एकूण तीन गोळ्या फायर केल्या. एपीआय निलेश मोरे यांच्यावर अक्षय शिंदे याने गोळीबार केल्याची माहिती आहे. ज्यामध्ये ते जखमी झाले आहेत. बदलापूर पोलिसांकडून क्राइम ब्रँच अक्षय शिंदेचा ताबा घेत असताना ही घटना घडली. अक्षय शिंदे याची बदलापूर बलात्कार प्रकरणात चौकशी सुरू आहे. एसआयटीकडून त्याची चौकशी सुरू आहे. त्याला कोठडीही देण्यात आली होती. त्यामुळे त्याला तळोजा तुरुंगात ठेवण्यात आलं होतं. मात्र, आणखी एका गुन्ह्यात त्याला ताब्यात घेण्यासाठी बदलापूर पोलीस आज तळोजा येथे आले होते. पोलीस तळोजा कारागृहात पोहोचले होते. अक्षयचा ताबा घेऊन त्याला बदलापूरकडे नेत असताना ठाण्याच्या हद्दीत अक्षयने पोलिसांच्या हातून बंदूक हिसकावून पोलिसांवर गोळीबार केला. त्यामुळे पोलिसांनी त्याच्यावर सेल्फ डिफेन्ससाठी गोळीबार केला. त्यात त्याचा मृत्यू झाला आहे. मात्र, पोलिसांनी या वृत्ताला अद्याप दुजोरा दिला नाही. या झटापटीत एका पोलिसालाही गोळी लागल्याने हा पोलीस अधिकारी जखमी झाला आहे. दोघांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पोलिसाची प्रकृती गंभीर आहे.

# हम आग की तरह जलाने वाले नही, हम सूरज की तरह रोशनी देने वाले

## पंतप्रधान मोदी यांची न्यूयॉर्कमध्ये तुफान फटकेबाजी



**न्यूयॉर्क**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे न्यूयॉर्क दौऱ्यावर आहेत. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात असलेल्या भारतीय वंशाच्या नागरिकांना संबोधित केलं. यावेळी बोलताना त्यांनी "हम आग की तरह जलाने वाले नही, सूरज की तरह रोशनी देने वाले है." पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या वक्तव्यानं उपस्थित नागरिकांनी मोठा जल्लोष केला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चांगलीच फटकेजाबी केली. दुसरीकडं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी न्यूयॉर्क शहरात आयोजित परिषदेत अनेक राष्ट्राध्यक्ष आणि इतर देशांच्या प्रमुखांशी द्विपक्षीय चर्चा केली. यात नेपाळचे पंतप्रधान के पी सरमा ओली, कुवैतचे प्रिंसेस शेख सबाह खालेद अल-हमद अल-सबाह अल-सबाह, पॅलेस्टाईनचे राष्ट्राध्यक्ष महमूद अब्बास आदींसह Quad Summit मध्ये सहभागी झालेल्या नेत्यांशी त्यांनी चर्चा केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी न्यूयॉर्कमधील भारतीय वंशाच्या नागरिकांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी "हम आग की तरह जलाने वाले नहीं, सूरज की किरण की तरह रोशनी देने वाले हैं." त्यांच्या वक्तव्यानं उपस्थित भारतीय वंशांच्या नागरिकांनी मोठा जल्लोष केला. पुढं बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, की "जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा उंचावत आहे. आज भारत जागतिक आपत्तीला प्रथम प्रतिसाद देणारा देश आहे. भारत आता संधींची भूमी झाला आहे. भारत आता संधींची वाट पाहत नाही, तर तो संधी निर्माण करतो. मागील 10 वर्षात भारतानं प्रत्येक क्षेत्रात संधी निर्माण केल्या आहेत. जगात दबाव वाढवण्याला भारताचं प्राधान्य नाही, तर जगात प्रभाव वाढवण्याला आता भारताचं प्राधान्य आहे. त्यामुळे भारत आणि अमेरिका यांची मैत्री अधिक मजबूत होत आहे. भारत आणि अमेरिकेची मैत्री जागतिक हितासाठी महत्वाची आहे." यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेतील बोस्टन आणि लॉस एंजेलिस इथं दोन नवीन दूतावास उघडण्याचा निर्णय जाहीर केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेतील न्यूयॉर्क इथं विविध उद्योग जगतातील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना संबोधित केलं. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी "भारताचं 5जी मार्केट हे अमेरिकेतील मार्केटपेक्षा मोठं आहे. हे केवळ मागील दोन वर्षात घडलं. आता भारत 6जी बनवण्याची तयारी करत आहे," असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

न्यूयॉर्कच्या नासाऊ कोलिजियम इथं भारतीय वंशाच्या नागरिकांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जोरदार फटकेबाजी केली. यावेळी त्यांनी जगासाठी एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता, मात्र माझ्यासाठी एआय म्हणजे अमेरिका भारत. ही नवीन एआय शक्ती आहे. भारतीय नागरिकांनी नेहमीत जगात भारताचं नाव उज्वल केलं आहे. त्यामुळे भारतीय वंशाचे नागरिक देशाचे मजबूत ब्रँड अॅम्बेसडर आहेत. त्यामुळेच मी तुम्हाला राष्ट्रदूत असं म्हणतो. या राष्ट्रदुतांमुळेच आपला नमस्ते आता बहुराष्ट्रीय झाला आहे. तुम्ही भारताला अमेरिकेशी आणि अमेरिकेला भारताशी जोडलं आहे. तुमचं कौशल्य, आणि वचनबद्धता अतुलनीय आहे. परदेशात असून कोणताही महासागर तुम्हाला भारतापासून वेगळं करू शकत नाही. "वसुधैव कुटुंबकम" म्हणजेच "जग एक कुटुंब आहे" ही परंपरा कायम ठेवल्याबद्दल तुमचं करावं तेव्हढं कौतुक कमी आहे, असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी स्पष्ट केलं.

## चाइल्ड पॉर्नोग्राफी डाउनलोड करणे आणि पाहणे हा POCSO आणि IT कायद्यानुसार गुन्हा - सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली**

चाइल्ड पॉर्नोग्राफी डाउनलोड करणे आणि पाहणे हा POCSO आणि IT कायद्यानुसार गुन्हा असल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय फेटाळला आहे. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी परडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय फेटाळत शब्द देखील वापरु नये, अशा शब्दात फटकारले आहे. मद्रास उच्च न्यायालयाने म्हटले होते की, जर कोणी चाइल्ड पॉर्नोग्राफी डाउनलोड करून पाहत असेल, तर त्याचा प्रसार करण्याचा हेतू असल्याशिवाय तो गुन्हा नाही. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, न्यायालयाने आपल्या निर्णयात गंभीर चूक केली आहे. आम्ही ते फेटाळून लावतो आणि केस पुन्हा सत्र न्यायालयात पाठवतो.



न्यायमूर्ती जेबी परडीवाला यांनीही संसदेला सुचवले आणि म्हणाले की, चाइल्ड पोर्नोग्राफी ऐवजी 'बाल लैंगिक शोषण आणि अपमानास्पद सामग्री' हा शब्द वापरला जावा. केंद्र सरकारने अध्यादेश आणून बदल करावेत. न्यायालयानेही चाइल्ड पोर्नोग्राफी हा शब्द वापरू नये.


सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात केरळ उच्च न्यायालय आणि मद्रास उच्च न्यायालयाचे निर्णय फेटाळले आहेत. केरळ उच्च न्यायालयाने 13 सप्टेंबर 2023 रोजी म्हटले होते की, जर एखादी व्यक्ती अश्लील फोटो किंवा व्हिडिओ पाहत असेल तर तो गुन्हा नाही, परंतु जर तो इतरांना दाखवत असेल तर तो बेकायदेशीर असेल. केरळ उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे, मद्रास उच्च न्यायालयाने 11 जानेवारी रोजी बाल पोर्नोग्राफी प्रकरणात एका आरोपीची निर्दोष मुक्तता केली होती. यानंतर एनजीओ जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रन अलायन्स आणि नवी दिल्लीतील एनजीओ बचपन बचाओ आंदोलन यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने 12 ऑगस्ट रोजी निर्णय राखून ठेवला होता.

आम्ही संसदेला POCSO कायद्यात सुधारणा करण्यास सुचवतो आणि नंतर पोर्नोग्राफी या शब्दाच्या जागी बाल लैंगिक अत्याचार आणि शोषणात्मक साहित्य म्हणावे, त्यासाठी अध्यादेशही आणता येईल. चाइल्ड पोर्नोग्राफीमुळे मुलांचा छळ आणि अत्याचाराच्या घटनांच्या आधारे आम्ही हा निर्णय दिला, असे खंडपीठाने म्हटले आहे. तसेच अशा प्रकरणांची तक्रार करताना समाजाची भूमिका लक्षात घेतली जाते.

## 'लापता लेडीज' ऑस्करसाठी नॉमिनेट

**मुंबई**

किरण राव दिग्दर्शित 'लापता लेडीज' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर घवघवीत यश मिळवलं होतं. चित्रपट समीक्षकांपासून ते बॉलीवूडप्रेमींपर्यंत प्रत्येकाला या सिनेमाची गोष्ट भावली होती. अखेर किरण रावच्या प्रयत्नांना मोठं यश मिळालं आहे. 'फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया'ने 'लापता लेडीज' हा चित्रपट ऑस्करसाठी भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून पाठवला आहे.




९७ व्या अकादमी पुरस्कारांसाठी म्हणजेच ऑस्करसाठी भारताकडून 'लापता लेडीज'ची निवड करण्यात आली आहे. सर्वोत्कृष्ट विदेशी चित्रपट श्रेणीसाठी 'लापता लेडीज' या चित्रपटाला नामांकन मिळालं आहे. यासंदर्भात अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. द फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाच्या सदस्यांनी अकादमी पुरस्कारांसाठी भारताच्या अधिकृत प्रवेशाची घोषणा केली आहे.

फिल्म फेडरेशनकडून लापता लेडीजसह एकूण २९ चित्रपट पाठवण्यात आले होते. यात रणबीर कपूरचा 'अॅनिमल', कार्तिक आर्यनचा 'चंदू चॅम्पियन', प्रभासचा 'कल्की 2898 एडी', मल्याळम चित्रपट 'आट्टम', राजकुमार रावचा 'श्रीकांत', कान्स फेस्टिव्हलमध्ये बाजी मारणाऱ्या 'ऑल वी इमेजिन अॅज लाइट' यांसारख्या चित्रपटांचा या २९ चित्रपटांच्या यादीत समावेश होता. मात्र, आमिर खानच्या प्रोडक्शनची निर्मिती असलेल्या 'लापता लेडीज'ने यात बाजी मारली आहे.

आसामी दिग्दर्शक जाह्नू बरुआ यांच्या अध्यक्षतेखालील १३ सदस्यांच्या निवड समितीने एकमताने किरण राव दिग्दर्शित लापता लेडीजचा अकादमी पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय ( विदेशी ) चित्रपट श्रेणीत समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

## प्रत्येक जिल्ह्यातील पत्रकार आपल्या पालकमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार!

### "डिजिटल"चे अध्यक्ष राजा माने यांची माहिती

**मुंबई**

महाराष्ट्राचे डिजिटल मिडिया धोरण जाहीर करणे आणि ज्येष्ठ पत्रकारांच्या सन्मान मानधन (पेन्शन) योजना संदर्भात डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रने केलेल्या मागण्यां विषयी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना निर्देश दिले.आता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी आदेश पारित व्हावे, यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील पत्रकार व डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रचे पदाधिकारी आपल्या जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार असल्याची माहिती डिजिटली मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्राचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी दिली.

डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रने केलेल्या मागण्या पूर्ण करण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे लवकरच महाराष्ट्राचे डिजिटल मिडिया धोरण जाहीर करणार आहेत.मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला तशा सूचना तीन दिवसांपूर्वी दिल्या आहेत.मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख व मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी मंगेश चिवटे यांच्या सहकार्याने डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेने केलेल्या पाठपुराव्याला हे यश मिळणार असल्याचे संघटनेचेही संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी सांगितले.

परवा मध्यरात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढे मंगेश चिवटे यांनी डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेने केलेल्या मागण्यांची बाजू विस्ताराने मांडली. ज्येष्ठ पत्रकारांना दिल्या जाणाऱ्या सन्मान मानधनाच्या रकमेत वाढ करुन दरमहा ११ हजार वरुन २० हजार करणे, राज्याचे डिजिटल मिडिया धोरण जाहीर करुन राज्यातील युट्यूब चॅनल्स, न्यूज पोर्टल्स, फेसबुक न्यूज पेजेस आणि सर्व डिजिटल प्लॅटफॉर्म्सवरील सर्व डिजिटल पत्रकारांना प्रगतीची द्वारे खुली करणे अशा विविध मागण्यांची दखल घेवून त्या पूर्ण करण्यासाठीचे प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना दिले.आज संघटनेच्या वतीने राजा माने यांनी मंगेश चिवटे यांच्या समवेत मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे , माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह यांची भेट घेतली.मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर राजा माने यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक डॉ.राहुल तिडके, बागुल, दयानंद कांबळे, गोविंद अहंकारी आदीं शी संपर्क साधून प्रस्तावित डिजिटल मिडिया धोरण आणि पत्रकारांच्या प्रलंबित मागण्यांकडे त्यांचे लक्ष वेधले. संघटनेचे सर्व पदाधिकारी आणि गावपातळीवरील सदस्यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश मिळणार आहे.

## रुग्ण बासरी वाजविताना मेंदुवर शस्त्रक्रिया

### कणेरी मठातील डॉक्टरांनी बासरीचे वादन करणाऱ्या रुग्णावर केली यशस्वी शस्त्रक्रिया

**बेळगाव**

कणेरी मठातील डॉक्टरांनी बासरीचे वादन करणाऱ्या रुग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया केली. दुर्मीळ ट्युमरवर शस्त्रकिराय करून डॉक्टरांनी नवा विक्रम केला. न्यूरोसर्जन डॉ. शिवशंकर मरजके आणि भूलतज्ज्ञ प्रकाश भारमगौडा यांनी ही शस्त्रक्रिया करून संपूर्ण जगाला आश्चर्यचकित केले.

शस्त्रक्रिया सुरू असताना रुग्ण आरामात झोपून बासरी वाजवित होता. त्याला कोणताही त्रास जाणवला नाही. सिद्धगिरी रुग्णालय आणि संशोधन केंद्राच्या डॉक्टरांनी जवळपास ५ तास शस्त्रक्रिया केली. डॉक्टरांच्या या टीमनं आजपर्यंत मेंदुच्या १०३ शस्त्रक्रिया केल्या आहेत. सिद्धगिरी रुग्णालय हे क्रॅनियोटॉमी शस्त्रक्रियेसाठीदेखील प्रसिद्ध आहे. कणेरी मठाचे कदसिद्धेश्वर स्वामी यांनी डॉक्टरांचे कौतुक केले.




डॉ. शिवशंकर मराजके यांनी कर्नाटकमधील बेळगावमध्ये माध्यमांशी बोलताना शस्त्रक्रियेची माहिती दिली. डॉ. मराजके म्हणाले, "सामान्यत: शस्त्रक्रिया सुरू असताना रुग्णाला इंजेक्शन देऊन भूल दिली जाते. मात्र, या शस्त्रक्रियेत शरीराच्या वरील भागापुरती भूल दिली आहे. त्यामुळे रुग्णाला भूल देऊनही तोंड, नाक, डोळे, हात आणि शरीराचे सर्व अवयव काम करीत होते. त्यामुळे आम्ही रुग्णाला बासरी वाजवायला सांगितले. त्यानंतर आम्ही रुग्णाच्या मेंदुतील ट्यूमर यशस्वीपणे काढला. देशात मेंदुवरील अशी कठीण शस्त्रक्रिया केवळ १० ते १२ ठिकाणी होते. त्याचे बिल किमान १० ते १५ लाख रुपये होते. असे असले तरी सिद्धगिरी रुग्णालय आणि संशोधन केंद्रात केवळ १ लाख २५ हजार रुपयात अशी शस्त्रक्रिया होते. कनेरी मठाचे स्वामी यांना रुग्णांबद्दल सहानुभूतीची भावना असल्यानंच हे शक्य झाले."



**शस्त्रक्रियेसाठी केवळ १.२५ लाख रुपये**

बेळगाव कणेरी मठाचे अदृश्य कादसिद्धेश्वर स्वामी म्हणाले, " रुग्ण जागा असताना शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. पूर्ण आशिया खंडामध्ये अशी शस्त्रक्रिया कधीही झाली नाही. आमच्या कनेरी मठाच्या सिद्धगिरी रुग्णालयानं असा अनोखा विक्रम केला आहे. रुग्णाचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी त्याला बासरी वाजवित आणि आईस्क्रीम खात ऑपरेशन करण्याची परवानी दिली. मोलमजुरी आणि गरीब रुग्णांच्या शस्त्रक्रियेसाठी केवळ १.२५ लाख रुपये बिल आकारण्यात येते. त्यामधील ५० टक्के बिल हे आमच्या देणगीतून देण्यात आले.

# मराठा आणि ओबीसी दोन्ही समाजाची सरकारकडून बोळवण, नेत्यांचा आरोप

मुंबई

विधानसभा निवडणुकांमुळे ओबीसी आणि मराठा या दोन्ही समाजाला आरक्षणाच्या नावाखाली सरकारकडून बोलवण केली जात आहे, असा आरोप मराठा क्रांती ठोक मोर्चाचे आबासाहेब पाटील आणि ओबीसी नेते, माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी केला आहे. मंत्रालयात शुक्रवारी वैयक्तिक कामानिमित्त आलेल्या नेत्यांना आरक्षणासंदर्भात विचारले असता, त्यांनी भूमिका मांडली.

राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात हैदराबाद गॅझेट आणि सगेसोयरे या शब्दाला मान्यता देत ओबीसी प्रमाणपत्रे देण्याचा निर्णय घेतला. मात्र सगेसोयरे हा शब्द सरकारने पुन्हा मर्यादितच ठेवला. त्यामुळे आतापर्यंत ओबीसी नोंदी असलेल्या मराठा समाजातील नागरिकांना मिळणाऱ्या प्रमाणपत्राच्या सुविधेत कोणताही बदल झालेला नाही. सरकारने केवळ मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देत असल्याचा भास निर्माण केला, अशी भावना मराठा समाजाची झाली आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी पुन्हा एकदा उपोषण सुरू केले. तर ओबीसी समाजातून मराठा समाजाला आरक्षण देण्यात येऊ नये, ओबीसींच्या आरक्षणाला कुठलाही धक्का लागू नये यासाठी आता ओबीसी समाजही रस्त्यावर उतरला आहे. यामुळे मराठा आणि ओबीसी समाजातील संघर्ष वाढू लागला आहे. मराठा आणि ओबीसी समाजातील संघर्षाचा राजकीय फायदा होईल, अशी अटकळ काही राजकीय पक्षांनी बांधली आहे. मात्र विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आरक्षणाचा मुद्दा पुन्हा चर्चेला आल्याने सरकारची धावपळ उडाली आहे. सरकारकडून उपोषण सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मराठा आणि ओबीसी समाजाच्या नेत्यांमध्ये सरकारबाबत साशंकता आहे.

सरकारकडून मराठा समाजाची दिशाभूल मराठा समाजाची सरकारने पुन्हा एकदा दिशाभूल सुरू केली आहे. समाजाला आरक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे. मात्र मराठा समाजाच्या आरक्षणाला सरकार वाटाण्याच्या अक्षता लावत आहे. मराठा समाजाने एक पाऊल मागे घ्यावे यासाठी सरकारकडून विविध सवलती आणि योजना जाहीर केल्या. मात्र मूळ प्रश्न आरक्षणाचा आहे. त्याबाबत सरकार काहीही ठोस कार्यवाही करताना दिसत नाही. ओबीसी जात प्रमाणपत्र कुणबी नोंद असलेल्या मराठा समाजाला यापूर्वी सुद्धा मिळत होती. सरकारने केवळ त्या नोंदी वेगाने तपासण्याचे काम केले. याच्यापलीकडे काहीही केलेले नाही. त्यामुळे सरकारने मराठा समाजाला आरक्षण द्यावे, कायद्याच्या कसोटीवर टिकणार आरक्षण सरकारला देणे शक्य आहे. परंतु, मात्र सरकार त्यासाठी चालढकल करत आहे, सरकारने याबाबत ताबडतोब तोडगा काढावा अन्यथा मराठा समाज आगामी निवडणुकीत प्रस्थापित राजकारण्यांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा आबासाहेब पाटील यांनी दिला.

**ओबीसीला धक्का न लागता मराठा आरक्षण देणे शक्य - राठोड**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात उपवर्गीकरण समाजांचे करा असे निर्देश दिले आहेत. जर सर्व जातींचे उपवर्गीकरण करण्यात आले, तर हा प्रश्न लवकरात लवकर सुटेल. मात्र सरकार त्या दिशेने प्रयत्न करताना दिसत नाही. केंद्र सरकारने नेमलेल्या रोहिणी आयोगांच्या शिफारशी सरकारने ताबडतोब मान्य कराव्यात. राज्य सरकारने नेमलेल्या भारतीय आयोगाने राज्यात ओबीसींची संख्या 37.88 टक्के म्हणजेच 38 टक्के असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे मराठा समाजाला ओबीसी आरक्षणांमधून आरक्षण देणे शक्य आहे. ओबीसींच्या मूळ 27 टक्के आरक्षणाला देखील यामुळे कुठलाही धक्का लागणार नाही.

# प्रकाश आंबेडकरांकडून तिसऱ्या आघाडीची पुन्हा घोषणा विधानसभेत कोणालाही पाठिंबा नाही

मुंबई

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी पुन्हा एकदा तिसऱ्या आघाडीची घोषणा केली. दरम्यान, विविध समाजाशी जोडलेल्या नेत्यांसोबत तिसऱ्या आघाडीबाबत चर्चा सुरू असे सांगत, शनिवारी ११ मतदारसंघातील उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. लोकसभेप्रमाणे यावेळी कोणत्याही राजकीय पक्षाला पाठिंबा देणार नसल्याचे आंबेडकर यांनी स्पष्ट केले. दादर पूर्वेकडील आंबेडकर भवन येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर, दिशा पिंकी शेख यावेळी उपस्थित होत्या.

राज्यात राष्ट्रपती राजवट लावली जाईल अशी शक्यता काहीजण वर्तवत होते. मात्र, अशा पद्धतीची कोणतीही शक्यता नाही. कारण विधिमंडळाचे सभागृह खंडित होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागते. विधिमंडळातील आमदारांचा कार्यकाळ संपत असून २७ नोव्हेंबर पूर्वी सरकार स्थापन होणे अपेक्षित आहे. त्यामुळे १५ नोव्हेंबरला निवडणुका घ्याव्याच लागणार आहेत. त्यासाठी वंचित बहुजन आघाडीने राज्यभरात तयारी सुरू केली असून वंचितच्या वतीने आता राज्यात पुन्हा एकदा समविचारी पक्षांची तिसरी आघाडी करण्याचा प्रयत्न सुरू आहेत. त्यानुसार वंचितने गोंडवाना पार्टी तसेच भारतीय आदिवासी पार्टी यांच्यासह जिल्हानिहाय ओबीसी संघटनांची चर्चा केली आहे. बहुसंख्या ओबीसी संघटना तिसऱ्या आघाडीत येण्यास तयार आहेत. त्यानुसार ही तिसरी आघाडी आम्ही तयार करत आहोत. या तिसऱ्या आघाडीचे नाव अद्याप निश्चित झालेले नाही. मात्र लवकरच ते आम्ही ठरवू असेही आंबेडकर म्हणाले. तसेच राजू शेट्टी यांनी पश्चिम महाराष्ट्रातील काही जागांची मागणी करणारी यादी आमच्याकडे दिली आहे. परंतु, त्याचवेळी ते अन्य काही पक्षांशी चर्चा करत आहेत. त्यामुळे त्यांच्या आघाडीतील समावेशाबाबत अद्याप निश्चिती नाही. लवकरच त्याबाबत स्पष्टता होईल. तर प्रहार संघटनेचे बच्चू कडू यांच्यासोबत चर्चा झाली मात्र त्यांचे आणि आमचे जमणार नाही. त्यामुळे कडू आमच्या सोबत येणार नाहीत, अशी भूमिका आंबेडकर यांनी मांडली.

**काँग्रेस राष्ट्रवादीने निवडणूक लढवू नये**

तिसऱ्या आघाडीचा फायदा हा नेहमीच भारतीय जनता पार्टीला होतो, अशी चर्चा आहे. त्यामुळे यावेळी सुद्धा तो फायदा भाजपाला होईल का असा प्रश्न विचारला असता, आंबेडकर म्हणाले की राज्यातील



काँग्रेस आणि राष्ट्रवादीला अशी भीती वाटत असेल तर त्यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरू नये. निवडणुका ही लढवू नयेत. अन्य कुणाला फायदा व्हावा म्हणून आम्ही निवडणुका लढवत नाही, तर आम्ही आमच्या ताकदीवर रणांगणात उतरतो, असेही त्यांनी ठणकावले.

**उमेदवार जिंकून आणण्यासाठी प्रयत्न करणार**

लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने तिसरी आघाडी स्थापन करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्यावेळी काही ठिकाणी वंचित नाही काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना मदत करण्याची भूमिका घेतली होती. आधी चर्चा झाल्यामुळे आम्हाला ती भूमिका घ्यावी लागली होती. मात्र ,यावेळी आम्ही स्पष्टपणे कोणत्याही पक्षाला मदत देणार नाही आणि प्रत्येक ठिकाणी आमचा उमेदवार कसा जिंकून येईल, यासाठी प्रयत्न करणार आहोत, असेही आंबेडकर यांनी सांगितले. तसेच निवडणुकीबाबतचा जाहीरनामा आम्ही लवकरच प्रसिद्ध करणार असून राज्याचा विकास आणि रोजगार हे दोन प्रमुख मुद्दे आमच्या जाहीरनाम्यात असतील असेही त्यांनी सांगितले.

**वंचितची पहिली यादी जाहीर**

उमेदवारांना प्रचारासाठी योग्य वेळ मिळावा, म्हणून वंचित बहुजन आघाडीने आपली पहिली यादी जाहीर केली. रावेर मतदासंघातून शमिभा पाटील (तृतीय पंथी/लेवा पाटील), सिंदखेड राजा मतदार संघातून सविता मुंढे (वंजारी), वाशिम मतदासंघातून मेघा किरण डोंगरे (बौद्ध), धामणगाव रेल्वे मतदासंघातून नीलेश विश्वकर्मा (लोहार), नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघातून विनय भांगे (बौद्ध), साकोली मतदासंघातून डॉ. अविनाश नन्हे (धीवर), नांदेड दक्षिण मतदासंघातून फारूक अहमद (मुस्लीम), लोहा मतदारसंघातून शिवा नारांगले (लिंगायत), औरंगाबाद पूर्व मतदासंघातून विकास दांडगे (मराठा), शेवगाव मतदासंघातून किसन चव्हाण (पारधी), खानापूर संग्राम माने ( वडार) यांची पहिल्या यादीत उमेदवारी निश्चित झाली आहे.

# डिझेल तस्करीप्रकरणी 10 जणांना अटक

मुंबई

समुद्रात डिझेलची तस्करी करणाऱ्या दहा आरोपींना यलोगेट पोलिसांनी अटक केली आहे. कोपवा ते मांडवी दरम्यानच्या रिंग नावाच्या परिसरातून त्याला पकडण्यात आले. मासेमारीच्या नावाखाली हे आरोपी समुद्रात जात असत, मात्र पोलिसांसमोर ते काही चालत नव्हते. पोलिसांच्या प्रश्नांची सरबत्ती होताच आरोपी जाळ्यात सापडले आणि त्यांनी पोलिसांसमोर आपले गुपित उघड केले. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी एका बोटीत डिझेल घेऊन जात होते. त्यानंतर समुद्रात गस्त घालणाऱ्या पोलिसांच्या बोटीला एक संशयास्पद बोट दिसली. याठिकाणी काही अवैध काम सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. आरोपींनी मासेमारीसाठी डिझेल घेऊन समुद्रात जात असल्याचे सांगताच पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले आणि चौकशी सुरू केली. मात्र पोलिसांनी त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. त्यामुळे पोलिसांनी बोटीसह किनाऱ्यावर येऊन ती जप्त केली. बोटीत 11 हजार लिटर डिझेल भरले होते. आरोपी तिची तस्करी करत असल्याचा आरोप आहे. मात्र, आरोपींनी हे डिझेल तस्करीच्या माध्यमातून आणल्याचे प्रश्नोत्तरात सिद्ध झाले. पोलिसांनी आरोपींना विचारले की, मासेमारीसाठी डिझेल भरून समुद्राच्या मध्यभागी जात असाल तर मासेमारी केल्यानंतर ते बर्फात ठेवले जाते आणि बाकीचे सामान तिथेच ठेवायचे आहे. आरोपींना याचे उत्तर देता आले नाही आणि त्यानंतर तस्करीचे भक्कम पुरावे सापडल्यानंतर या प्रकरणी एफआयआर नोंदवण्यात आला आणि 10 जणांना अटक करण्यात आली. सूत्रांवर विश्वास ठेवायचा झाल्यास, आरोपी एकतर मोठ्या टँकरमधून डिझेल काढतात किंवा सागरी सीमेवरून बोटींमध्ये डिझेल भरतात. इतर देशांमध्ये डिझेल स्वस्त असल्याने तेथूनही डिझेल बोटीतून आणले जाते.

# राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या निशाण्यावरती नितेश राणेच का ?

मुंबई

हिंदू जनआक्रोश मोर्चातून नितेश राणेंचं जहाल हिंदुत्ववादी रूप मागील काही महिन्यांपासून जनतेसमोर येत आहे. या सर्व हिंदू जन आक्रोश मोर्चातून येत असलेली नितेश राणे यांच्या वक्तव्यांवर ते आक्षेप घेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाने भाजपच्या वरिष्ठांकडे नाराजी प्रकट केली आहे. त्यांच्या नाराजीची कारण देखील तशीच आहेत. महायुतीमध्ये राहून "एम" फॅक्टरचा वापर व्हावा असाच काहीसा उद्देश अजित पवार गटाचा असल्यामुळेच त्यांनी मुंबई आणि मुंबई शहरालगत असलेल्या पाच विधानसभा क्षेत्रांमध्ये मुस्लिम उमेदवार देणार असल्याने नितेश राणे यांचा विरोध त्यांना करावा लागत आहे.

**पदरात पडणाऱ्या जागांच्या दहा टक्के जागा मुस्लिम उमेदवारांना**

विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष मुस्लीम समाजाला सर्वाधिक जागा देणार असल्याची माहिती समोर आली आहे. जागा वाटपात मिळणाऱ्या एकूण जागांपैकी १० टक्के जागांवर मुस्लीम उमेदवार देणार असल्याची माहिती मिळाली आहे. मुंबईत चार आणि एमएमआर रिजनमध्ये १ अशा ५ जागांवर मुस्लीम उमेदवार देणार आहेत. महायुतीमध्ये मुंबईत राष्ट्रवादीला ४ जागा सुटणार आणि चारही जागांवर मुस्लीम उमेदवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष देण्याची शक्यता आहे.

**कोण आहेत अजित पवारांचे संभावित मुस्लिम उमेदवार**

मुंबई आणि एम एम आर रीजनमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाकडून चार ते पाच उमेदवार हे मुस्लिम समाजातून दिले जाणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून कळते. यामध्ये नवाब मलिक, सना मलिक, जिशान सिद्दीकी आणि नजीम मुल्ला यांना उमेदवारी देण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. यांना उमेदवारी मिळाल्यानंतर त्यांच्याच पक्षांमध्ये असलेले इतर समाजातील अनेक जण बंडखोरी देखील करू शकतात.

# लाखो राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना दिलासा राष्ट्रीय व एकीकृत निवृत्ती वेतन योजना लागू

## 1 मार्च 2024 पासून अंमलबजावणी



मुंबई

राज्य सरकारच्या अखत्यारीत कार्यरत लाखो कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन व केंद्र सरकारची एकीकृत निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याबाबत शुक्रवारी शासन निर्णय जारी करण्यात आला असून १ मार्च २०२४ पासून अंमलबजावणी होणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील लाखो कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचारी यांना वरील दोन्ही योजनेपैकी कोणत्याही एका योजनेत सहभागी होण्यास मुभा आहे, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

शासन निर्णयान्वये राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ नुसार अनुज्ञेय असलेली जुनी निवृत्तिवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करुन १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीअंती खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजनेबाबत शिफारस, अहवाल शासनास सादर करण्यासाठी सेवानिवृत्त भा.प्र.से. अधिकारी यांची समिती गठीत करण्यात आली होती. राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या शिफारशींबाबत चर्चा करुन सर्व संबंधितांच्या सहमतीने निश्चित करण्यात आलेली सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. तसेच केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी एकीकृत निवृत्तिवेतन योजना २४ ऑगस्ट २०२४ रोजी जाहीर केली असून, प्रस्तुत योजनाही राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

**पात्र व इच्छुकांना वन टाईम ऑप्शन!**

राज्य शासनाच्या सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेसाठी पात्र व इच्छुक कर्मचाऱ्यांनी या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी एक वेळचा (One Time Option) विकल्प ३१ मार्च २०२५ पर्यंत संबंधित कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख यांचेकडे सादर करावा.

**लाभासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत विकल्प निवडा!**

केंद्र शासनाच्या एकीकृत निवृत्तिवेतन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी तसा विकल्प ३१ मार्च २०२७ पर्यंत किंवा केंद्र शासनाच्या 'एकीकृत निवृत्तिवेतन योजना' संदर्भात निर्गमित होणाऱ्या तपशीलवार मार्गदर्शक सूचनेमध्ये विकल्पाची निवड करण्याचा नमूद दिनांक यापैकी जो अगोदरचा दिनांक असेल तोपर्यंत फक्त एकदाच देण्याची मुभा आहे. तद्नंतर सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेंतर्गत दिलेला विकल्प कोणत्याही कारणास्तव बदलता येणार नाही.

# घाण पाणी समुद्रात जाण्यापासून रोखावे : राज्यपाल

मुंबई

आंतरराष्ट्रीय बीच क्लीनअप दिनानिमित्त, राज्यपाल सीपी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकांत शिंदे आणि अनेक मंत्री आणि अधिकारी जुहू बीचवरील स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते. यावेळी राज्यपाल म्हणाले की, प्रत्येक मोठ्या कामाची सुरुवात छोट्या गोष्टींनी होते. शनिवार हा समुद्रकिनारा स्वच्छतेसाठी जनजागृती दिवस आहे आणि समुद्रकिनारे उपक्रम मोठा आकार घेईल आणि 'स्वच्छ भारत, महान भारत' या संकल्पनेला आकार देईल. ते म्हणाले की, घाण पाणी स्वच्छ करून प्रक्रिया करूनच समुद्रात सोडले पाहिजे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, समुद्रकिनारे स्वच्छ ठेवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरात स्वच्छ भारत अभियान सुरू केले आहे. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव म्हणाले की, समुद्रकिनारे स्वच्छ करण्यासाठी जगभरात जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मिशन लाइफ संकल्पनेनुसार स्वच्छ भारत निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे. पंतप्रधानांच्या 'एक झाड आईच्या नावावर' मोहिमेत सहभागी होऊन प्रत्येकाने किमान एक झाड लावावे. पाणी पुनर्प्रक्रिया करणाऱ्या स्टार्टअप्सना केंद्र सरकारच्या माध्यमातून मदत दिली जाईल, अशी घोषणा त्यांनी केली.

# विमानतळावर 3.12 कोटी रुपयांचे सोने जप्त

मुंबई,

सीमाशुल्क विभागाने गेल्या दोन दिवसांत विमानतळावर दोन वेगवेगळ्या प्रकरणात 3 कोटी 12 लाख रुपयांचे सोने आणि हिरे जप्त केले आहेत. याप्रकरणी तीन प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. या लोकांनी हे सोने त्यांच्या पँट, बेल्ट आणि बनियानच्या खास खिशात लपवून आणले होते आणि ग्रीन चॅनल ओलांडण्याचा प्रयत्न करत होते. दुबईहून मुंबईला येणाऱ्या एका प्रवाशाची झडती घेतली असता त्याच्याकडून 97 लाख रुपये किमतीचे 12 सोन्याचे बार जप्त करण्यात आले. त्याने हे सोने आपल्या पट्ट्यात लपवून ठेवले होते.

# सर्व मंदिरातील प्रसादाची चौकशी करण्याची मागणी

मुंबई

तिरुपती मंदिरात प्रसाद म्हणून दिल्या जाणाऱ्या लाडूंमध्ये प्राण्यांच्या चरबीची कथित भेसळ होत असल्याच्या वृत्तांदरम्यान मुंबईस्थित एका संस्थेने FSSAI ला पत्र लिहिले आहे. अन्न आणि औषध परवानाधारक फाउंडेशनने हे पत्र लिहिले आहे. फाऊंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अभय पांडे म्हणाले की, प्रसादात प्राण्यांची चरबी वापरल्याच्या बातम्यांमुळे लोकांच्या विश्वासाला धक्का बसला आहे. भविष्यात असे होऊ नये म्हणून भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाच्या (FSSAI) अध्यक्षांना पत्र लिहिले आहे. देशभरातील मंदिरांमध्ये प्रसाद वाटप करण्याच्या सूचना देण्याची मागणी या पत्रात करण्यात आली आहे. FSSAI नियमांमध्ये प्रसादला विशेष दर्जा देऊन त्याचे वर्गीकरण करण्याची विनंती करण्यात आली आहे.

पांडे म्हणाले की, आतापर्यंत एफएसएसएआय कायद्यात प्रसादाची व्याख्या करण्यात आलेली नाही, त्यामुळे व्याख्या निश्चित करून प्रसादात कोणते पदार्थ मिसळायचे आणि कोणते नाहीत हे ठरवावे. ज्या पदार्थात मिसळण्यास मनाई आहे अशा पदार्थांचा प्रसाद कोणाला मिळाला तर त्याच्यावर कडक कारवाई करावी.

# वादग्रस्त विधानबाबत गृह खात्याकडून माहिती घेऊन कडक कारवाई करण्याचे राज्यपालांचे आश्वासन

मुंबई



राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून राज्यात राजकीय व सामाजिक अस्थिरता निर्माण झाली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळाली नाही. यामुळे जनतेमध्ये, शेतकरी वर्गात प्रचंड प्रमाणात अस्वस्थता आहे. या सर्व प्रश्नांवर काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने आज राज्यपालांची भेट घेऊन निवेदन दिले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस कार्यसमितीचे सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, चंद्रकांत हंडोरे, मुंबई काँग्रेस अध्यक्ष खा. वर्षाताई गायकवाड, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, खा. विशाल पाटील, माजी मंत्री अस्लम शेख, डॉ. विश्वजीत कदम, आ. भाई जगताप, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव रविंद्र दळवी, आ. अमिन पटेल, आ. विक्रम सावंत, चरणसिंह सप्रा, सचिन सावंत उपस्थित होते.

सिंधुदुर्गातील मालवण येथे महाराष्ट्राचे अराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा फक्त पुतळा कोसळला नाही तर महाराष्ट्राचा स्वाभिमान कोसळला. या पुतळ्याच्या कामात भ्रष्टाचार करणा-यांवर अद्याप कारवाई केली नाही. सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून सातत्याने महाराष्ट्राच्या समृद्ध राजकीय परंपरेला काळीला फासला जात आहे. आमदार संजय गायकवाड यांनी राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्यास बक्षीस देण्याची तर खासदार अनिल बोंडे यांनी राहुल गांधी यांच्या जिभेला चटके देण्याची विधाने केली आहेत. लोकशाहीत विरोधकांवर टीका करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, पण विरोध करताना जीवाला धोका निर्माण करणे, हिंसेला प्रवृत्त करण्याची भाषा लोकप्रतिनिधींनी वापरणे हे कायद्याला धरून नाही. या प्रकरणात मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांनी आणि पोलिसांनी खेदाने बघ्याची भूमिका घेतली. गुन्हा दाखल करण्यासाठी देखील काँग्रेस नेत्यांना आंदोलन करावी लागली त्यानंतर गुन्हे दाखल झाले, पण आमदार संजय गायकवाड आणि खासदार अनिल बोंडे यांना अजूनही अटक करण्यात आलेली नाही. प्रक्षोभक विधाने करून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणा-या आमदारांवर पोलिस कारवाई करत नाही याचा अर्थ राज्यात दंगली घडवण्याचा सत्ताधारी पक्षांचा कट आहे का?

मराठवाड्यात अतिवृष्टी झाली, शेतकऱ्याचे सहा लाख हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले. अजूनही याचे पंचनामे झालेले नाहीत. केंद्रीय कृषी मंत्री यांनी आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्याचा दौरे करून मदत जाहीर केली पण महाराष्ट्रात मात्र अजूनही केंद्रीय कृषी मंत्री किंवा केंद्रीय पथक पाहणी करण्यास आले नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांबाबत इतका दूजाभाव का ? या राज्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा दिसत नाही का त्यांना मदत करण्याची केंद्र आणि राज्य सरकारची भूमिका नाही.

राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे बिघडली आहे. विधानसभा निवडणूक निर्भय वातावरणात होईल याबाबत शंका आहे. राज्यात महिलांवरील अत्याचारात मोठयाप्रमाणात वाढ झाली असून अल्पवयीन, शाळकरी मुलींवरील अत्याचाराच्या बदलापूर व नागपूर येथे घडलेल्या गुन्ह्यात आरोपींना पाठीशी घालण्याचे काम सरकारकडून केले जात आहे. स्पर्धा परीक्षा रखडल्या आहेत. उमेदवारांना सरकारकडून नियुक्त्या देण्यात आलेल्या नाहीत. युवा पिढी बेरोजगारीमुळे नैराश्याच्या गर्तेत जात आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी आपण सरकारला निर्देश द्यावेत, अशी राज्यातील जनतेची आपणाकडून अपेक्षा आहे, असे काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने राज्यपालांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी या संपूर्ण प्रकरणात लक्ष घालणार असल्याचे आश्वासन काँग्रेस शिष्टमंडळाला दिले आहे. त्याचबरोबर वादग्रस्त विधानबाबत गृह खात्याकडून माहिती घेऊन कडक कारवाई करण्याचे आश्वासनही राज्यपाल यांनी दिले.

# सुजाता सौनिक यांच्यावर राजीनाम्यासाठी दबाव- दानवे राज्यपालांना पत्र लिहून चौकशीची मागणी

मुंबई

राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांना पदाचा राजीनाम्यासाठी शिंदे सरकारकडून दबाव टाकण्यात येत असल्याचा आरोप विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. तसेच सौनिक यांचे पती मनोज सौनिक यांच्यावर खोटी कारवाई करुन त्यांना अडकवण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे, असा दावाही दानवे यांनी केला आहे. याबाबत त्यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना पत्र लिहून याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी केली आहे.

शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी सुजाता सौनिक यांच्यावर मुख्य सचिवपदाचा राजीनामा देण्यासाठी सरकारकडून दबाव टाकण्यात येत असल्याचा आरोप केला होता. सौनिक यांना राज्य निवडणूक आयुक्तपदाची ऑफर देण्यात आली होती. सौनिक यांना हटवून मुख्य सचिवपदी डॉ. आय. एस. चहल यांना बसविण्याच्या हालचाली सुरु असल्याची चर्चा होती. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पालघरच्या सभेत सुजाता सौनिक यांच्या कार्याची प्रशंसा केल्यानंतर मुख्य सचिव बदलाच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला होता. मात्र, दानवे यांनी याप्रकरणी थेट राज्यपालांना पत्र लिहिल्याने सौनिक यांच्यावरील दबावाचा विषय पुन्हा चर्चेत आला आहे.

सुजाता सौनिक या शिस्तीच्या अधिकारी आहेत. सरकारच्या कट प्रॅक्टिसला थारा न देणाऱ्या सौनिक यांच्यावर सरकारतर्फे आता राजीनाम्यासाठी दबाव टाकला जात आहे. तसे न केल्यास त्यांच्या पतीवर या ना त्या वाटे खोटी कारवाई करण्याची तयारी सरकार करत आहे. सरकारच्या निर्णयांना विरोध केल्यामुळे त्यांना राजीनामा देण्यास भाग पाडले जात आहे. त्यांनी राजीनामा दिल्यास त्यांचे पती मनोज सौनिक यांना महत्त्वाच्या पदी नियुक्ती देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडून देण्यात आला आहे. हा प्रस्ताव नाकारल्यास त्यांना कायदेशीर बाबीमध्ये अडकवण्यात येणार असल्याची सर्वत्र चर्चा आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे, असे दानवे यांनी पत्रात म्हटले आहे.

राज्य सरकारच्या धोरणांच्या विरोधात असलेले आणि महाराष्ट्रात आपली कारकीर्द गाजवणाऱ्या व्ही. राधा, आय.ए. कुंदन यांच्या सारख्या अनेक भारतीय प्रशासकीय सेवेतील महिला अधिकाऱ्यांना अति महत्वाच्या विभागातून बदली करून कमी महत्त्वाच्या विभागामध्ये पाठविण्यात आले आहे. एकीकडे लाडकी बहीण म्हणून राज्यात रोज इव्हेंट करायचे. दुसरीकडे सक्षम भगिनीला त्रास देण्यासाठी षडयंत्र रचायचे असा कारभार सुरु असल्याची अशी टीका दानवे यांनी केली आहे.

# मराठा समाजाच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री शिंदेसोबत बैठक

## ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही : शंभूराज देसाई

मुंबई



कुणाच्यातरी ताटातलं काढून दुसऱ्याला वाढायचं ही राज्य सरकारची भूमिका नाही, ओबीसींच्या आरक्षणातून कुठलंही आरक्षण काढलं जाणार नाही, त्यांच्यावर कुठलाही अन्याय होणार नाही अशी ग्वाही राज्याचे मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पुण्यातून आलेल्या मराठा आंदोलकांच्या शिष्टमंडळाची बैठक संपली. त्यानंतर शंभूराज देसाई यांनी माध्यमांशी संवाद साधला.

मराठा समाजाच्या शिष्टमंडळाची मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेसोबत बैठक झाली. मराठा समाजाच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात या बेठकीत चर्चा करण्यात आली. मराठा आंदोलकांवरचे गुन्हे मागे घ्या, मुंबई, हैदराबाद आणि सातारा गॅझेट लागू करा अशा मागण्या मराठा समाजाच्या शिष्टमंडळानं मुख्यमंत्र्यांसमोर केल्या. मराठा समाजाच्या मागण्यांवर उद्यापासून अधिक गतीनं काम सुरु करा अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात येणार आहेत अशी प्रतिक्रिया शंभूराज देसाईंनी दिली. शंभूराज देसाई म्हणाले की, शिष्टमंडळाच्या लोकांनी मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा केली. मराठा समाजाच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात चर्चा झाली. त्यामध्ये प्रामुख्याने गुन्हे मागे घेणं, मुंबई, हैदराबाद आणि सातारा गॅझेट लागू करणं हे मुद्दे होते. त्यासंदर्भात मी आणि चंद्रकांतदादांनी तात्काळ त्यासंदर्भात कामाला लागावं अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी केल्या आहेत. मराठा समाजाला आरक्षण मिळावं ही मुख्य मागणी आहे. हैदराबाद गॅजेट लागू करा, सगेसोयऱ्यांचं नोटिफिकेशन काढा या सगळ्या जरांगेंच्या मागण्याचं ड्राफ्ट नोटिफिकेशन काढण्यावर चर्चा आहे. ओबीसींच्या आरक्षणातून कुठलंही आरक्षण काढलं जाणार नाही, त्यांच्यावर कुठलाही अन्याय होणार नाही.



*'नॅशनल कॅन्सर रोज डे' निमित्त राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी रविवारी (दि. २२) बाल कर्करुग्णांशी संवाद साधला तसेच त्यांना त्यांना गुलाबाचे फुल व भेटवस्तू दिल्या. राज्यपालांच्या सूचनेनुसार लहान मुलांना राजभवनाची सैर करविण्यात आली. भेटीचे आयोजन कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन (CPAA) या संस्थेने केले होते. यावेळी असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष वाय.के. सप्रू, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अलका सप्रु बिसेन व कार्यकारी संचालिका निता मोरे उपस्थित होते.*

# रेल्वे ड्रोनच्या साहाय्याने फवारणी करून ट्रॅक वाचवणार

मुंबई

रेल्वेला पावसाळ्याच्या आधी आणि दरम्यान रुळांच्या आजूबाजूचे गवत आणि जंगली झाडे काढून टाकावी लागतात. पावसाळ्यात ट्रॅकच्या देखभालीचा हा महत्त्वाचा भाग आहे. या तणामुळे अनेक वेळा रुळांमध्ये तडे किंवा इतर कमतरता दिसून येत नाहीत. मात्र, ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. त्याची चाचणी हार्बर मार्गावर झाली. येथे ड्रोनच्या सहाय्याने फवारणी करून तण नष्ट करण्यात आले.

मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वानील नीला यांनी सांगितले की, तुर्भे येथे एका खासगी कंपनीकडून वीड किलर स्प्रे फवारण्यात आले. ड्रोनच्या मदतीने केलेल्या फवारणीचे परिणाम खूपच उत्साहवर्धक होते. नीला म्हणाल्या की, पावसाळ्यापूर्वी रुळावरील गवत आणि तण काढण्याचे काम हाताने केले जाते. अनेकवेळा गवताच्या आच्छादनाखाली साप, विंचूही राहतात आणि त्यामुळे ट्रॅकची देखभाल करणाऱ्यांना धोका असतो. याशिवाय तणांमुळे रुळांची खरी स्थिती पाहणेही अवघड झाले आहे. नीला यांनी सांगितले की, हे काम पावसाळ्यापूर्वी आणि पावसाळ्याच्या दरम्यान दोनदा केले जाते. मात्र, ड्रोनच्या सहाय्याने घेण्यात आलेल्या चाचण्यांनंतर आता ते तंत्रज्ञानाच्या मदतीने काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



चाचणी दरम्यान, 1 किमी फवारणी 15 मिनिटांत झाली, तर हाताने फवारणीसाठी जास्त वेळ लागतो. याशिवाय मॅन्युअल फवारणीच्या तुलनेत १८ टक्के चांगले निकाल मिळाले. ड्रोन फवारणी 90 टक्के कमी पाणी वापरते. एका अधिकाऱ्याने सांगितले की, खासगी एजन्सीने घेतलेली ही चाचणी फायदेशीर ठरली आहे. त्यामुळे भविष्यात या तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. घाट विभागात हे तंत्र सर्वाधिक प्रभावी ठरणार आहे.

# मुंबईला येणाऱ्या गरीबरथ एक्सप्रेसमध्ये शिरला साप

मुंबई

कसाऱ्याजवळ गरिब रथ मेल मध्ये विषारी साप शिरला. त्यामुळे प्रवाशांची एकच घाबरगुंडी उडाली. गरीब रथ एक्सप्रेसमध्ये हा साप प्रवाशांना दिसला. दरम्यान या घटनेचा व्हिडीओही व्हायरल झाला आहे. जबलपूरहून मुंबईला जाणाऱ्या गरीब रथ एक्सप्रेसमध्ये एक विषारी साप दिसला. एक्सप्रेसच्या कोच जी 3 सीट क्रमांक 23 च्यावर हा साप दिसला. हा साप दिसल्यानंतर प्रवाशी घाबरूनच गेले. हा साप वरच्या दिशेने बाहेर जाण्याचा प्रयत्न करत होता. पण त्याला बाहेर पडायला जागाच नाही मिळाली. कसारा रेल्वे स्टेशनजवळ आल्यावर एका प्रवाशाला हा साप दिसला. प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाला याबाबत माहिती दिली. तेव्हा रेल्वेने या प्रवाशांना दुसऱ्या कोचमध्ये हलवलं.



# आर्मी मॅन असल्याचे भासवून ज्योतिष महिलेची फसवणूक

मुंबई

जुहू पोलीस ठाण्यात एका महिला ज्योतिषीने अज्ञात व्यक्तीविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या ७० वर्षीय महिलेने तक्रारीत म्हटले आहे की, ६ ऑगस्ट रोजी तिला एका अनोळखी नंबरवरून फोन आला. फोन करणाऱ्याने महिलेला सांगितले की तो भारतीय लष्कराकडून फोन करत आहे. त्याला आपल्या सैनिकांची कुंडली बनवायची आहे. कुंडली बनवण्याच्या बहाण्याने आपली फसवणूक झाल्याचा आरोप पीडितेने केला आहे.

नोंदवलेल्या तक्रारीनुसार, कॉलरने ज्योतिषाला विचारले की तिला प्रत्येक कुंडलीसाठी किती दक्षिणा द्यावी लागेल. महिलेने त्याला कुंडलीमागे 3000 रुपये सांगितले. फोन करणाऱ्याने महिलेला सांगितले की, तिचे वरिष्ठ काही वेळाने फोन करतील. काही वेळाने संदीप रावत या एका वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याने त्यांना फोन केला. या बनावट अधिकाऱ्याने महिलेला व्हॉट्सॲपवर व्हिडिओ कॉल केला आणि सांगितले की त्याला आपल्या शेकडो सैनिकांच्या कुंडल्या काढायच्या आहेत. यासाठी तो गुगल पेद्वारे आगाऊ पैसे भरत आहे.

बनावट अधिकाऱ्याने महिलेला त्याच्या सूचनांचे पालन करण्यास सांगितले. तसेच तुमच्या मुलाच्या फोनवरून व्हिडिओ कॉल करा. दुसऱ्या मोबाईलवर गुगल पे उघडण्याची सूचना केली. दरम्यान, भामट्याने महिलेचा क्यूआर कोड मागितला. गुप्त पिन नंबरही तपासला. यानंतर महिलेच्या ॲक्सिस बँक, बँक ऑफ बडोदा आणि इंडियन पोस्ट बँकेतील खात्यातून १ लाख ६५ हजार रुपये कापण्यात आले. रात्री बँक बॅलन्स तपासल्यानंतर महिलेला हा प्रकार समजला. महिलेला लष्कराकडून एकही पैसा जमा झाला नाही, उलट तिच्या खात्यातून १.६५ लाख रुपये कापण्यात आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने सायबर हेल्पलाइन क्रमांकावर तक्रार केली. त्यानंतर महिलेने जुहू पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल केली. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत

# फॅशन स्ट्रीटचा लवकरच होणार मेकओव्हर



मुंबई

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) आणि चर्चगेट स्टेशनपासून अवघ्या दहा मिनिटांच्या अंतरावर, परवडणाऱ्या किमतीत ट्रेंडी कपड्यांच्या खरेदीसाठी प्रसिद्ध असलेल्या फॅशन स्ट्रीटचा लवकरच मेकओव्हर होणार आहे. सध्याच्या स्टॉलच्या प्रोटोटाइप स्टॉलच्या डिझाइनला मान्यता देण्यात आली आहे. एका स्टॉलमध्ये 6 दुकाने असतील, असे बीएमसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. प्रोटोटाइप स्टॉलची किंमत सुमारे 30-40 लाख रुपये असेल. म्हणजे एका दुकानाची किंमत सुमारे 5 लाख रुपये असेल. बीएमसीचे म्हणणे आहे की 112 दुकानांच्या निविदांनंतर किंमत 25 टक्क्यांनी कमी होण्याची अपेक्षा आहे. अशा प्रकारे, दुकानाची अंतिम किंमत सुमारे 3-4 लाख रुपये असेल. फॅशन स्ट्रीटच्या दुकानदारांना हा खर्च उचलावा लागणार आहे. अधिकाऱ्याने सांगितले की, बीएमसी येथे फूटपाथ, शौचालये, पेव आणि फर्निचरची व्यवस्था करेल. फॅशन स्ट्रीट हेरिटेज विभागाच्या अखत्यारीत येतो. त्यामुळे त्याची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

प्रोटोटाइप स्टॉलसाठी त्याचा तिसरा लिफाफा या आठवड्यात उघडला जाण्याची अपेक्षा आहे. हे फॅशन स्ट्रीटमधील खरेदीदारांना अधिक चांगला अनुभव देईल.

बीएमसीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, फॅशन स्ट्रीट अशा प्रकारे बनवला जाईल की आझाद मैदान आणि क्रॉस मैदानातील बागा दिसतील. याशिवाय आधुनिक सुविधांसह लॅश टॉयलेट आणि फर्निचरची व्यवस्था करण्यात येणार आहे. फॅशन स्ट्रीटमध्ये 112 अधिकृत दुकाने आहेत. आतापर्यंत जी दुकाने थेट फूटपाथच्या दिशेने आहेत, ती एकमेकांच्या विरुद्ध असतील. त्यांच्यामध्ये अंतर असेल आणि त्यामध्ये बसण्यासाठी एक बेंच असेल. दक्षिण मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया, मरीन ड्राइव्ह आणि इतर ठिकाणी येणारे देशी-विदेशी पर्यटक स्वस्त आणि ट्रेंडी कपडे खरेदी करण्यासाठी फॅशन स्ट्रीटवर येतात. अनेक दशकांपासून येथे एका फूटपाथवर 112 दुकाने थाटण्यात आली होती.

झाली आहे. या दुकानांनी फूटपाथचा अर्धा भाग व्यापला आहे. त्यामुळे दुकानदारांना चालायला जागा उरली नाही.

# 9.73 कोटींच्या अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या ब्राझिलियन महिलेला विमानतळावर अटक

मुंबई

गुप्तचर विभागाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे कारवाई करून, महसूल गुप्तचर संचलनालयाच्या मुंबई विभागीय युनिटच्या अधिकाऱ्यांनी, 18.09.24 रोजी साओ पावलो येथून मुंबई विमानतळावर आलेल्या एका ब्राझिलियन महिलेला ताब्यात घेतले.

चौकशीत, त्या प्रवाशाने अंमली पदार्थ असलेल्या कॅप्सूलचे सेवन केल्याचे आणि भारतात तस्करी करण्यासाठी ते शरीरात घेतल्याचे कबूल केले. प्रवाशाला न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले आणि न्यायालयाच्या आदेशानुसार तिला मुंबईच्या सर जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले.

तिने 973 ग्रॅम कोकेन असलेली एकूण 124 कॅप्सूल्स उलटीद्वारे बाहेर काढली, ज्याची किंमत अवैध बाजारात 9.73 कोटी रुपये आहे. चाचणी अहवालानुसार ते कोकेन असल्याचा दावा करण्यात आला असून एनडीपीएस कायदा, 1985 च्या तरतुदींनुसार 21.09.2024 रोजी जप्त करण्यात आले होते. प्रवाशाला अटक करण्यात आली आहे आणि भारतात अंमली पदार्थांची अवैध तस्करी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीच्या इतर सदस्यांचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

या कारवाईतून अंमली पदार्थांच्या धोक्यावर नियंत्रण ठेवण्याप्रति डीआरआयची अतूट वचनबद्धता दिसून येते.

# माहीम जुवेनील चषक कॅरम स्पर्धेत ज्युनियर 32 खेळाडूंमध्ये चुरस

मुंबई

माहीम जुवेनील स्पोर्ट्स क्लब-शिवाजी पार्क व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे २५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या कॅरम स्पर्धेत शालेय-कॉलेजमधील ज्युनियर ३२ खेळाडूंमध्ये अजिंक्यपदाचा माहीम ज्युवेनील चषक पटकाविण्यासाठी चुरस होईल. मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यातील शालेय ज्युनियर खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी कॅरम स्पर्धा होत असून पहिल्या १६ विजेत्या-उपविजेत्यांना माहीम जुवेनील स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष विजय येवलेकर व उपाध्यक्ष विकास खानोलकर यांच्या हस्ते आकर्षक १६ पुरस्कारासह स्ट्रायकरद्वारे गौरविण्यात येणार आहे. माहीम जुवेनील पव्हेलीयन, शिवाजी पार्क येथे ही विनाशुल्क कॅरम स्पर्धा रंगणार आहे.

शालेय-महाविद्यालयीन मुख्य कॅरम स्पर्धेअगोदर स्पर्धात्मक सरावात विजेतेपद पटकाविण्यासाठी आयएनजी इंग्लिश स्कूल-वसईचा श्रीशान पालवणकर, रुपारेल कॉलेजचा कुणाल जाधव, पाटकर विद्यालय-डोंबिवलीचा नील म्हात्रे, एमडी कॉलेजचा साम्यक पवार, ठाकूर रामनारायण स्कूल-दहिसरचा तीर्थ ठाकर, इन्फंट जेसस स्कूल-अंबरनाथचा ओमकार चव्हाण, लव्ह ग्रोव्ह एमपीएसचा सिद्धांत मोरे, वरळी सीफेस म्युनिसिपल स्कूलचा रेहान शेख, नारायण गुरु स्कूल-चेंबूरचा उमेर पठाण, जन गण मन कॉलेज-कोपरचा अथर्व म्हात्रे, पोद्दार अकॅडमी हायस्कूल-मालाडचे पुष्कर गोळे व प्रसन्ना गोळे आदी उत्सुक आहेत. परिणामी दादरकरांना दर्जेदार लढती पाहण्यास मिळतील. श्रीशान पालवणकर वि. बालाजी काठूरोजीगारी आणि पृथ्वी बडेकर वि. शुभम परमार यामधील उदघाटनीय लढती एमजेएससीचे सेक्रेटरी सुनील पाटील, खजिनदार महेश शेट्ये व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहेत.

## नौदल अधिकाऱ्याची 22 लाखांची सायबर फसवणूक

मुंबई

शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली नौदल अधिकाऱ्याची २२ लाख रुपयांची सायबर फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला असून गेल्या काही महिन्यांमध्ये अशा प्रकारे फसणवूक करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या प्रकरणी दक्षिण प्रादेशिक सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून बँक खात्यातील व्यवहाराच्या मदतीने पोलिसांनी सांताक्रुझ येथील रहिवासी असलेल्या आरोपीला अटक केली आहे. त्याच्याकडून पाच लाख रुपये जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

# सोने गहाण ठेवण्याच्या बहाण्याने व्यावसायिकाची फसवणूक

मुंबई

कर्जासाठी सोने देण्याच्या बहाण्याने पुण्यातील एका व्यावसायिकाची ३२ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मरिन ड्राइव्ह पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस आरोपी कल्याण सरगुडे, विजय कुमार आणि रफिक भाटिया यांचा शोध घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमनाथ केदारी हे पुण्यात शेती करतात. त्यांचे किराणा दुकान आणि पिठाची गिरणीही आहे. एफआयआरनुसार केदारीची ओळख सागर नावाच्या व्यक्तीशी झाली होती. सागरच्या सांगण्यावरून त्याने रफिक आणि विजयला सोन्यासाठी ३२ लाख रुपये दिले. दोघांनी केदारीला मरीन ड्राईव्हवरील हॉटेलमध्ये येऊन सोने गोळा करण्यास सांगितले. केदारी हॉटेलमध्ये पोहोचले असता त्यांना आरोपींचे फोन बंद असल्याचे दिसले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच केदारीने मरीन ड्राइव्ह पोलिसांकडे धाव घेतली.

# सोन्याच्या लालसेपोटी व्यावसायिकाचे 13 लाखांचे नुकसान

मुंबई

स्वस्त सोने खरेदीचे आमिष दाखवून तेल पुरवठादार व्यावसायिकाची १३.५ लाख रुपयांची फसवणूक झाली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे व्यापारी बीड येथील रहिवासी आहेत. व्यावसायिकाच्या मित्राने त्याला अशा व्यक्तीशी जोडण्यास सांगितले जे 67 हजार रुपये प्रति दहा ग्रॅम स्वस्त दरात सोन्याची नाणी देऊ शकेल.

आरोपी मित्राच्या सूचनेनुसार व्यावसायिकाने मुंबईत येऊन मित्राची विक्रोळी स्थानकावर भेट घेतली. दुसऱ्या दिवशी व्यावसायिकाला संतोष गवळे नावाच्या व्यक्तीचा फोन आला, तो राजेश कदम नावाच्या दुसऱ्या मित्रासोबत विक्रोळीतील व्यावसायिकाला भेटला. बाजारातील दरापेक्षा कमी किमतीत सोन्याची नाणी मिळतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

आरोपानुसार, गवळे याने व्यावसायिकाला विक्रोळी महामार्गावर बोलावून अस्सल सोन्याचे नाणे दाखवून त्यांचा विश्वास जिंकला. त्यानंतर दोघेही महामार्गावरून विक्रोळी येथील बसस्थानकावर आले, तेथे राजेश कदम आणि अजय शर्मा दोघांची वाट पाहत होते.

गवळे यांनी व्यावसायिकाला 100 ग्रॅमची दोन नाणी दाखवून विचारले की, पैसे आणले का? पीडितेने १३.५० लाखांची बॅग दाखवली असता शर्मा आणि कदम यांनी कथित सोन्याची नाणी असलेली बॅग गवळे यांच्याकडे दिली. यानंतर दोघेही कारमधून घटनास्थळावरून पळून गेले.

संधी पाहून गव्हाळेही तेथून निघून गेले. नंतर व्यावसायिकाने नाणी तपासली असता ती बनावट असल्याचे समजले. विक्रोळी पोलीस तीन आरोपींचा शोध घेत आहेत.

# सर्वांना एकत्र आणणाऱ्या 'ओणम'च्या मूल तत्वांचे सर्वांनी पालन करावे – राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन

मुंबई



देशात साजरा केला जाणारा प्रत्येक सण समाजाला एकत्र आणण्याचे काम करतो. ओणम हा प्राचीन सण साजरा करताना केरळीय समाजामार्फत सांस्कृतिक वारसा जपला जातो, ही उत्साहवर्धक बाब असून सर्वांनी आजही समर्पक असणाऱ्या एकता, करुणा आणि सेवा या मूल्यांचे पालन करावे, असे आवाहन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

बॉम्बे केरळीय समाजाच्या वतीने आज मुंबईत ओणम उत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी समाजासाठी योगदान देणाऱ्यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच 'विशाल केरलम' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. बॉम्बे केरळीय समाजाचे अध्यक्ष डॉ. एस. राजशेखरन, मानद सचिव विनोदकुमार नायर, उपाध्यक्ष प्रदीपकुमार यांच्यासह समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले, बॉम्बे केरळीय समाजाने सातत्याने नवोदितांना पाठिंबा दिला आहे, केरळच्या समृद्ध संस्कृतीला चालना दिली आहे. आरोग्य, शिक्षण, समाजकल्याण आदी क्षेत्रांत अमूल्य सेवा दिली आहे, हे कौतुकास्पद आहे. बॉम्बे केरळीय समाजाचा मागील आठ दशकांचा उल्लेखनीय प्रवास, समाजाच्या समर्पण आणि लवचिकतेचा पुरावा असून मुंबईच्या विकासात समाजाचे मौलिक योगदान असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. समाजात कुणी लहान किंवा मोठा नसतो, हा संदेश देऊन आपण कुठेही राहिलो तरीही आपले मूळ विसरू नये, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. ओणमच्या शुभेच्छा देऊन समाजाची अशीच भरभराट होत राहो अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.

# नेहरू विज्ञान केंद्रात मेटल आयन 2024 या आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन

मुंबई




मुंबईत वरळी इथल्या नेहरू विज्ञान केंद्रात आजपासून मेटल आयन 2024 या आंतरराष्ट्रीय परिसंवादाला सुरुवात झाली. यानिमित्ताने आज झालेल्या कार्यक्रमाला आंतर विद्याशाखीय संशोधन, पर्यावरण संवर्धन आणि मानवी आरोग्य क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ तसेच देशभरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रा. (डॉ.) सुनाली खन्ना यांनी या आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे अध्यक्षस्थान भूषवले. तर अमेरिकेतील प्रा. (डॉ.) इरिना स्टेपानोव्ह, तुर्कीये इथले प्रा. (डॉ.) उलाज ओझ आणि भारतीय मौखिक औषधशास्त्र आणि किरणोत्सर्ग शास्त्र अकादमीचे अध्यक्ष प्रा. (डॉ.) श्रीकृष्ण, राजस्थान विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि सोक्लिन (सोसायटी फॉर क्लीन एन्व्हायर्नमेंट) या नामांकित स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. ए. डी. सावंत यांच्यासह तामिळनाडूचे प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि सदस्य सचिव, तामिळनाडूच्या पाणथळ प्राधिकरण आणि तामिळनाडू सरकारच्या हरित तामिळनाडू अभियानाचे मुख्य अभियान संचालक दीपक श्रीवास्तव हे मान्यवर या परिसंवादाला उपस्थित होते. मेटल आयन 2024 या आंतरराष्ट्रीय परिसंवादात पर्यावरण, सार्वजनिक आरोग्य आणि मौखिक औषधांशी संबंधित महत्त्वाच्या विषयांच्या केंद्रस्थानी असलेल्या सुदृढ पर्यावरणासाठी जागरूकतेला चालना या विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या वैशिष्ट्यपूर्ण परिसंवादादरम्यान इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक सादरीकरण स्पर्धेचेही आयोजन केले गेले आहे.

राष्ट्रीय स्वच्छ भारत अभियान उपक्रमाच्या अनुषंगाने या परिसंवादात विज्ञाननिष्ठ नवोन्मेषाला गती देण्यासाठी पर्यावरणीय स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व देखील अधोरेखित केले जाणार आहे. या परिसंवादाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये भारतातील शाळांनीही त्यांच्या विद्यार्थ्यांना पाठवण्याचे आवाहनही केले गेले आहे. यानिमित्ताने येणाऱ्या युवा सहभागींना सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणविषयक समस्यांशी संबंधित महत्त्वाच्या विषयांबाबतचे त्यांचे आकलन, त्यांची, सर्जनशीलता आणि त्यांच्यामधील संशोधन कौशल्य उपस्थितांसमोर मांडण्याची संधी मिळणार आहे.

# संपादकीय

## दुधारी तलवार

सध्या वन नेशन, वन इलेक्शन बद्दल जोरदार चर्चा सुरू आहे. भूतपूर्व राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली एक राष्ट्र आणि एक निवडणुकीची कल्पना साकार होणे शक्य आहे किंवा नाही. याबाबत निर्णय घेण्यासाठी पूर्व राष्ट्रपतींना पाचारण करण्यात आले होते. आता जेव्हा त्यांना ते काम दिले. तेव्हा जिकडे तिकडे चोहीकडे, 'मोदी मोदी मोदीच गडे' अशी परिस्थिती होती. यापूर्वीही मोदीजींनी दिल्ली सरकारचे सर्व अधिकार तेथील उप राज्यपालांना देण्याचा कायदा संमत केला होता. निवडणूक आयुक्तांच्या निवडीचा जो आदेश काढण्यात आला. तो सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला झुगारूनच काढण्यात आला. आता हे नवे अपत्य जन्माला घालताना केंद्रीय मंत्रिमंडळाच्या दवाखान्यात त्याचे बाळंतपण झाले. पण मुळात हे बाळ इतके आजारी आहे की, त्याला स्वस्थ करण्यासाठी अनेक औषधांची गरज आहे. सर्वप्रथम अल्पमतातील मोदी सरकारला हे विधेयक मंजूर करण्यासाठी संविधान संशोधनाची गरज पडणार आहे. त्यासाठी विरोधी पक्षांनाही सोबत घ्यावे लागणार आहे. आम्ही परवा याच स्तंभात सत्ताधाऱ्यांनी विरोधी पक्षांसोबत संवाद साधला पाहिजे, अशी वेडी आशा व्यक्त केली होती. पण इथे तर विरोधी पक्ष नेत्यांची जीभ छाटणे, त्यांची गत त्यांच्या आजीसारखी करणे किंवा जिभेवर चटके देणे अथवा क्रमांक एकचा आतंकवादी घोषित करणे. याचे कर्तरी, कर्मणी आणि भावे प्रयोग सुरू आहेत. हे विधेयक पारित करण्यासाठी 67% म्हणजेच दोन तृतीयांश खासदारांची सहमती आवश्यक आहे. हे प्रमाण आणखी सोपे करून सांगायचे झाल्यास तीन पैकी दोन खासदारांची सहमती यासाठी आवश्यक आहे. आता स्थिती अशी आहे की, मंत्रिमंडळांने हे विधेयक पारित केल्याबरोबर विरोधकांनी या विधेयकाच्या विरोधात घनघोर आक्रमण सुरू केले आहे. आताच्या एनडीएतील सदस्यांनी विरोध केलेला दिसत नाही. मात्र यापूर्वीच्या दोन-तीन विधेयकांना भाजप शिवाय एनडीएतील अनेक पक्षांनी विरोध केला होता. त्यामुळे सरकारला पलटी मारावी लागली होती. तिकडे या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी बलाढ्य विरोधी पक्ष असलेल्या इंडियाने कंबर कसलेली आहे. म्हणजे आता एनडीए आणि इंडिया या विधेयका बाबतीत दोन ध्रुवांवर आहेत. राज्यसभेतही एनडीएला स्पष्ट बहुमत नाही. आपल्या देशात 1971 ची मुदतपूर्व निवडणूक होईपर्यंत, म्हणजे 1967 च्या निवडणुकीपर्यंत देशातील लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यात आल्या होत्या. त्यानंतर विभिन्न कारणांनी या निवडणुका एकसाथ घेणे शक्य झालेले नाही. कारण पुढे अनेक राज्यातील सरकारे आपसातील फुटीमुळे बरखास्त झाली आणि मग त्यासाठी वेगळी निवडणूक घ्यावी लागली. मधल्या काही काळात केंद्रातील सरकारेही अनेक पक्षांच्या कुबड्या घेऊन चालत होती. त्यावेळी चंद्रशेखर, इंद्रकुमार गुजराल, व्हीपी सिंग, एचडी देवेगौडा वगैरे पंतप्रधान अल्पजीवीच ठरले. खुद्द भारतीय जनता पक्षाचे सरकार अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वात स्थानापन्न झाले होते. त्यांनाही आपला कार्यकाळ पूर्ण करता आला नव्हता. हा सर्व इतिहास सांगण्याचे कारण असे की, या समितीने खर्च वाचवण्यासाठी जी शिफारस केली आहे. त्यात एक महत्त्वाचा मुद्दा असाही आहे की, केंद्रात पंतप्रधान पदावर मोदीजींचा चेहरा असला म्हणजे दिल्लीपासून ग्रामपंचायतीपर्यंत सर्व ठिकाणी आपण विजय मिळवू शकू. म्हणजे समिती स्थापन झाली तेव्हा तशी स्थिती होती आणि आता शिफारस आली. तेव्हा भारतीय जनता पक्षाला केंद्रात स्वबळावर बहुमत नाही. इतर राज्यातही येत्या काळात ज्या निवडणुका होणार आहेत. त्यात भाजपाला पूर्वीसारखे बहुमत मिळेलच याची खात्री नाही. एक वेळी निवडणूक घेतल्याने खर्चात बचत होईल. आचारसंहिता वारंवार लागू करावी लागणार नाही. हे फायदे देशाला लाभदायक असले. तरी या निवडणुकीसाठी जो अफाट खर्च होतो. तो कमी होईल असे अजिबात वाटत नाही. आपल्या देशातील एकूण परिस्थिती पाहता या सर्व सुधारणा दुधारी तलवारी सारख्या आहेत, असे वाटते. कल्पना करा केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार नाही. पण दिल्लीत भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे. मग ज्याप्रमाणे आता उपराज्यपाल दिल्ली सरकारशी वागतात. तसाच प्रकार पुढेही कशावरून होणार नाही. त्यामुळे एक साथ निवडणुकांचा द्राविडी प्राणायाम करण्यापेक्षा इतर काही सुधारणा करता येतील काय? खर्चावर कायदेशीर बंधनापेक्षा इतर काही मार्गाने बंधने लावता येतील काय? याचा विचार करण्याची वेळ आता आलेली आहे. एकत्र निवडणुका म्हणजे नाकापेक्षा मोती जड होणार आहे हे तुम्ही लिहून ठेवा. आमच्या सांगण्याने फार काही बदल होईल या भ्रमात आम्हीही अजिबात नाही, हेही लिहून ठेवा. बस्स आगे आगे देखिये होता है क्या!

## वीर लांडे

आपल्या महाराष्ट्राचा एक वीर सुपुत्र बिहारच्या पोलीस सेवेत गेली 18 वर्षे आपली सेवा देत होता. त्या वीराचे नाव शिवदीप लांडे असे आहे. हे लांडे साहेब यापूर्वी मुंगेर येथील पोलीस अधीक्षक पदावर होते. हा धडाकेबाज पोलीस अधिकारी, न्यायाने चालणारा वीर आणि सामान्य जनतेचा हितैषी अशी त्यांची प्रतिमा आहे. ज्या भागात ते होते. त्या भागात त्यांचा एवढा दरारा होता की तेथील सगळे गुंड, पुंड आणि मुस्टंड त्यांच्यासमोर पार लयाला गेले होते. आपल्या बॉलीवूडमध्ये जसा सिंघम आहे तसे ते होते. बॉलीवूडचा सिंघम नकली असतो. तो फक्त अभिनय करतो. पण हे लांडे साहेब असली सिंघम आहेत. बिहारच्या राजकारणात गुंड, पुंड राजकारणी आणि मुस्टंड अपराधी यांचा जबरदस्त बोलबाला आहे. त्यामुळेच लांडे यांच्या सारख्या अधिकाऱ्याला आपल्या बदलीमुळे राजीनामा द्यावा लागला असावा. त्यांची पूर्णिया जिल्ह्यात बदली केल्यावर त्यांच्यासमोर कोणतेही आव्हान नव्हते. मग अशी पुळचट नोकरी करून राजकारण्यांसमोर लोचटपणा करत, बोथट होण्यापेक्षा बहुधा त्यांनी आपला राजीनामा फेकला असावा. हा राजीनामा नसून नाराजीनामा आहे असेच वाटते. हे लांडे साहेब आपल्या आमदार विजय शिवतारे यांच्या सुपुत्रीचे पती आहेत. हे शिवतारे तेच आहेत की, ज्यांनी अजित पवार आणि सुनेत्रा वहिनींना लोकसभा निवडणुकीच्या आधी दिवसा तारे दाखवले होते. सुनेत्राताई विरुद्ध लढायला विजय शिवतारे यांनी कंबर कसली होती. पण अखेर त्यांनाही एक 'नाथ' होता आणि त्या नाथाने शिवतारे यांना युती धर्माची आठवण करून दिली आणि सुनेत्रा ताईविरुद्ध लढण्यापासून परावृत्त केले होते. अशा मर्द मराठ्याचा जावई असल्यामुळे, सासरे बुवांचा कानमंत्र घेऊनच त्यांनी आपली नोकरी सोडली असावी. अठरा वर्षे बिहारमध्ये राहिल्यावर आपण परत आपल्या मायभूमीत येणार नाही. असे त्यांचे म्हणणे आहे. कारण आपण प्रवासी बिहारी नसून निवासी बिहारी आहोत, हे त्यांना दाखवायचे होते. पुढील एक वर्षात बिहारमध्ये विधानसभा निवडणुका आहेत. या एक वर्षात त्यांना आपली लोकप्रियता पुन्हा वाढवायची आहे. त्यासाठी ते बहुधा निवडणुकीच्या आखाड्यातही उतरतील. त्यांची अपार लोकप्रियता त्यांना निवडणुकीच्या महासागरातून पार करेल, यात आम्हाला तरी शंका नाही. तेव्हा लांडे साहेब तुम आगे बढो, जनता तुम्हारे साथ है आणि तुमच्यासोबत प्रशांत किशोर यांचा हात आहे, असेही काहीजण म्हणतात. त्यामुळे आपण प्रवासी बिहारी नसून निवासी बिहारी आहोत. हे तुम्हाला नक्कीच दाखवून देता येईल. तुम्हाला तुमच्या कार्यात सुयश मिळो, ही आमची सदिच्छा आहे. तुम्ही महाराष्ट्राचे आहात म्हणून जय महाराष्ट्र आणि बिहार तुम्ही कर्मभूमी मानली आहे, म्हणून जय बिहार. तुमच्या भावी जीवनात बहार येवो. हीच आमची शुभेच्छा!

# भारताचे शांती प्रस्थापनेचे प्रयत्न यशस्वी होतील का?

जागतिक संघर्षामध्ये अभ्यासलेल्या तटस्थत धोरणाच्या पलीकडे जाऊन शांततेच्या सक्रिय प्रयत्नांसाठी भारतीय आंतरराष्ट्रीय धोरण एक नवीन पवित्रा घेऊन प्रयोग करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा युरोपमधील सक्रिय युद्धक्षेत्राचा दौरा हे एक धाडसी आणि जोखमीचा राजनैतिक मिशन होते. पहिल्यांदाच एखाद्या भारतीय नेत्याने शांततेच्या समर्थनासाठी युद्धक्षेत्रात प्रवेश केला होता. हे आंतरराष्ट्रीय धोरण मोदी सरकारच्या 3.0 टप्प्यातील जूनमधील इटलीतील G7 नेत्यांसोबत झालेल्या बैठका, पुतीन यांच्यासोबतची जुलैमधील शिखर परिषद, ऑगस्टमध्ये कीवमध्ये झालेली भेट, राष्ट्रपती पुतीन आणि बिडेन यांच्यासोबत दूरध्वनीद्वारे युक्रेन भेटीची माहिती; तसेच सप्टेंबरमध्ये युनायटेड स्टेट्स (यूएस) आणि ऑक्टोबरमध्ये ब्रिक्स शिखर परिषदेसाठी रशियामधील आगामी संभाषणे यासारख्या भव्य दृष्टिकोनातून समजून घेणे महत्वाचे आहे.

अमेरिका आणि रशिया या दोन्ही गटांमध्ये भारत भागधारक असल्याने भू-राजकीय संतुलन महत्त्वाचे आहे.

अमेरिका आणि रशिया या दोन्ही लढाऊ शिबिरांमध्ये भारताकडे मजबूत समभाग असल्याने भू-राजकीय संतुलन महत्त्वाचे आहे. या दोन्ही जागतिक शक्ती भारताच्या धोरणात्मक, सुरक्षा, ऊर्जा आणि तंत्रज्ञानाच्या गरजांसाठी महत्त्वपूर्ण आहेत. सर्व प्रमुख शक्तींसोबत बहुआयामी करार हा भारताच्या सध्याच्या परराष्ट्र धोरणाच्या सिद्धांताचा केंद्रबिंदू आहे. परंतु मध्य युरोपमधील भारताने घेतलेली भूमिका, ही स्पष्टपणे इतर अनेक महत्त्वाच्या उद्दिष्टांसाठी भू-राजकीय संतुलनाच्या पलीकडे गेलेली दिसून येते.

**'पॉलिश' भागीदारी**

22 ऑगस्ट रोजी युरोपियन युनियनचा (EU) पाचवा सर्वात मोठा देश असलेल्या आणि 1 जानेवारी 2025 पासून EU अध्यक्षपद धारण करणाऱ्या पोलंडमधील मोदींच्या वास्तव्यामुळे भारताला मध्य युरोपमध्ये पायाभरणी करण्यास प्रभावीपणे मदत झाली. या भेटीमुळे, भारत-ईयू धोरणात्मक भागीदारीच्या चौकटी अंतर्गत द्विपक्षीय संबंध 'रणनैतिक' भागीदारीच्या पातळीपर्यंत उंचावले. यामुळे राजनैतिक, संरक्षण आणि आर्थिक हितसंबंध हे समस्यामुक्त आहेत या वस्तुस्थितीला मान्यता मिळाली. भारताबरोबर जवळपास 40 धोरणात्मक भागीदारीसह, दोन्ही बाजूंनी कामगारांच्या मुबलकतेला चालना देणारा सामाजिक सुरक्षा करार अंतिम केला असला तरीही, भारताच्या धोरणात्मक संबंधांच्या महत्त्वापेक्षा राजनैतिक संकेत अधिक महत्त्वाचा आहे.

**युद्धक्षेत्राकडील 'रेल्वेप्रवास'**

पोलंड हा नवीन युरोपचा चेहराच नाही तर ही नाटोची पूर्व आघाडी आहे, युक्रेनच्या युद्धप्रयत्नातील एक महत्त्वाचा पुरवठ्याचा मार्ग आहे. पोलंडच्या अमेरिकेशी असलेल्या निकटतेमुळे पोलंडला काही वेळा अमेरिकेचे '51 वे राज्य' म्हणून संबोधले जाते. कीव भेटीसाठी पोलंडने मोदींचे स्टेजिंग पोस्ट म्हणूनही काम केले, कारण युद्धामुळे हवाई क्षेत्र बंद करण्यात आले होते. पंतप्रधान मोदी रझेझोव या पोलिश ट्रान्स-कार्पेथियन प्रांतापासून कीवपर्यंत जाण्यासाठी प्रत्येक मार्गाने 10 तास चालणाऱ्या 'रेल फोर्स वन' या बुलेट-प्रूफ पोलिश ट्रेनने गेले. हा प्रवास शांततेसाठी केलेल्या अजून एका जोखमेची आठवण करून देणारा होता: २०१५ मध्ये मोदींची लाहोरला सदिच्छा भेट, जेव्हा त्यांनी तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्या कुटुंबातील लग्नाला उपस्थित राहण्यासाठी पाकिस्तानी हेलिकॉप्टरमध्ये प्रवेश केला.

पंतप्रधान मोदी रझेझोव या पोलिश ट्रान्स-कार्पेथियन प्रांतापासून कीवपर्यंत जाण्यासाठी प्रत्येक मार्गाने 10 तास चालणाऱ्या 'रेल फोर्स वन' या बुलेट-प्रूफ पोलिश ट्रेनने गेले.

जुलैमध्ये मोदींची मॉस्को भेट देखील सक्रिय संघर्षाच्या दरम्यान झाली. परंतु यावेळी, भारताच्या पंतप्रधानांनी संघर्षाच्या क्षेत्रात पाऊल ठेवले ज्यावेळी मागील पंधरवड्यात युक्रेनने रशियाच्या कुर्स्क प्रदेशावर केलेले आक्रमण आणि युक्रेनच्या डोनेस्तकमध्ये रशियाचे सतत घुसखोरी यामुळे चालू युद्ध धोकादायकरित्या वाढले होते. मोदींच्या आगमनाच्या आदल्या रात्री हवाई हल्ल्याचे सायरन वाजले होते. 30 महिन्यांच्या युद्धात दोन्ही देश भविष्यातील कोणत्याही वाटाघाटीच्या चर्चेत स्वत:च्या बाजू मजबूत करण्यासाठी प्रादेशिक बफर तयार करण्यात व्यस्त असल्याचे दिसते. आणि मोदींच्या भेटीनंतर तर रक्तपात आणखीनच वाढला.

शांततेसाठी चर्चा हे नि:संशयपणे ह्या भेटीचे उद्दिष्ट असले तरी, मोदींची भेट ही भू-राजकीय समतोल साधण्याच्या आणि पाश्चात्य देशांना खूश करण्याच्या पलिकडची होती. संयुक्त राष्ट्रांची सुरक्षा परिषद ही जागतिक महासत्तांच्या वेटो मताधिकारमुळे खिळखिळी झालेली दिसून येते, तसेच दोन्ही देशांच्या भूमिकेमध्ये प्रचंड तफावत असूनही आणि त्यांच्या नेत्यांमध्ये कोणतेही चांगले संबंध उरले नसताना देखील, रशिया आणि युक्रेन हे अशा वेळी मोदींशी संघर्षावर चर्चा करण्यास इच्छुक होते जेव्हा अश्या प्रकारची विश्वसनीय चर्चा मोजक्याच जागतिक नेत्यांवर दोन्हीही बाजूने समान विश्वास ठेवून करू शकतात.

नुकतीच दिल्लीत ग्लोबल साऊथ व्हर्च्युअल समिट आयोजित केल्यापासून, मोदी जागतिक अन्न, ऊर्जा आणि आरोग्य सुरक्षेवर या संघर्षामुळे गरीब राष्ट्रांवर होणाऱ्या वेदनादायक परिणामांवर विश्वासार्हपणे बोलू शकतील. मोदींनी जागतिक दाक्षिणात्य राष्ट्रांसाठी प्रस्तावित केलेल्या 'जागतिक विकास कॉम्पॅक्ट', हा एकप्रकारे 'शांतता कॉम्पॅक्ट' द्वारे पूरक असणे आवश्यक आहे ज्यामध्ये श्रीमंत राष्ट्रे लढत असलेले युद्ध आणि गरीब राष्ट्रांवर होणारे प्रतिकूल परिणाम ह्यावर तरतूद केलेली असेल.

**नैतिक राजकारणाच्या पलीकडे...**

भारताची, ही सक्रिय शांततेची भूमिका केवळ बुद्ध आणि गांधींच्या नैतिकतेतून आलेली नसून याने अनेक व्यावहारिक उद्दिष्टे पूर्ण केली—भारताच्या जागतिक सहभागासाठी जास्तीत जास्त मुत्सद्दी जागा निर्माण करणे, ज्यामुळे अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांसोबत फलदायीपणे सहभागी होण्यास अधिक वाव मिळतो; तसेच चीनपेक्षा वेगळी, एक जबाबदार शांतता शोधणारी उगवती शक्ती म्हणून भारताची प्रतिष्ठा वाढवणे; संघर्षामुळे स्वत:च्या आर्थिक मार्गाच्या रुळावरून घसरण्याचे धोके कमी करणे; आणि त्यांचा आवाज म्हणून काम करून ग्लोबल साउथचे नेतृत्व मजबूत करत आहे.

भारतीय परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने दक्षिण आशियातील बहुविध संकटांमध्ये अडकून न राहता जागतिक पातळीवर विचार करून, त्याच्या व्यापक हितांचे रक्षण करण्यास सक्षम असणे देखील महत्त्वाचे आहे. मोदी फक्त औपचारिकता निभावत नव्हते तर त्यांचे ध्येय गंभीरपणे घेत होते. त्यांच्यासोबत परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांच्यासह त्यांचे सर्वोच्च परराष्ट्र धोरण आणि सुरक्षिततेचे पथक होते.

झेलेन्स्की यांनी पुतीन विरुद्ध खाजगीत टीका केली असेल, परंतु त्यांनी भेटीनंतरच्या पत्रकार परिषदेत रशियाच्या नेत्याच्या विरोधात आपली सार्वजनिक प्रतिमा वाचवली, जिथे त्यांनी पुतीनविषयी अविश्वासचे आणि वाईट आरोप केले.

मोदींनी कीवमध्ये दोन्ही बाजूंनी एकत्र बसून या संकटातून मार्ग शोधणे आवश्यक आहे असा सल्ला दिला, त्यांनी युक्रेनला वैयक्तिकरित्या 'मित्र' म्हणून आणि भारत 'शांततेकडे वाटचाल करण्याच्या कोणत्याही प्रयत्नात सक्रिय भूमिका बजावण्यास' तयार असल्याचे आश्वासन दिले. दोन्ही बाजूंनी भारत-युक्रेन संयुक्त निवेदनही तयार केले. युक्रेनवरील रशियन आक्रमणाबद्दल त्यांच्या विचारांमधील दरी पाहता हे आश्चर्यकारक होते. झेलेन्स्की यांनी पुतीन विरुद्ध खाजगीत टीका केली असेल, परंतु त्यांनी भेटीनंतरच्या पत्रकार परिषदेत रशियाच्या नेत्याच्या विरोधात आपली सार्वजनिक प्रतिमा वाचवली, जिथे त्याने पुतीनविषयी अविश्वासचे आणि वाईट आरोप केले. भारताने पारंपारिक प्रतिस्पर्धी चीन आणि पाकिस्तानने केलेल्या ऐतिहासिक आणि अलीकडील प्रादेशिक घुसखोरीचे दाखले देत, सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेच्या तत्त्वांप्रती आपली वचनबद्धता अधोरेखित केली, जी भारतासाठी महत्त्वाची आहे. गेल्या दशकभरात, किमान 2014 मध्ये रशियाने क्रिमिया ताब्यात घेतल्यापासून, वरील तत्त्वे अधोरेखित करणे, त्याच वेळी पाश्चात्य निर्बंधांमध्ये सामील न होणे किंवा रशियाच्या युद्धाचा निषेध न करणे, ही भारताची एक सातत्यपूर्ण भूमिका आहे.

स्विस-युक्रेनियन 'शांतता शिखर परिषदे'च्या अयशस्वी प्रयत्न डोळ्यासमोर ठेवून, जिथे भारताने शिखर संप्रेषणावर अधिकृत स्तरावर स्वाक्षरी केल्याशिवाय भाग घेतला होता, 23 ऑगस्टच्या निवेदनात, भारताने युद्धाच्या सर्व भागीदारांनी अभिनव उपाय विकसित करण्यासाठी, त्यांच्या प्रामाणिक आणि व्यावहारिक सहभागाची गरज आहे हे पुन्हा एकदा स्पष्ट केले. ज्याची व्यापक स्वीकारार्हता असेल आणि शांतता पुनर्संचयित करण्यासाठी मदत होईल. याचा अर्थ असा होतो की, भारताच्या दृष्टीकोनातून, रशियाच्या सहयोगाशिवाय कोणतीही शांतता प्रक्रिया अर्थपूर्ण असू शकत नाही.

युक्रेनसाठी भारताने स्वित्झर्लंड, चीन किंवा तुर्कियेने केल्याप्रमाणे 'शांतता योजना' चातुर्य दाखवून काढली नाही. परंतु संकेत स्पष्ट होता - की भारत दोन्ही बाजूंसाठी आणि विशेषत: अमेरिकेशी बोलणी करून शांतता प्रस्थापित करणारी कोणतीही भूमिका बजावण्यास तयार असेल. त्याच वेळी भारताने युद्ध संपण्यापूर्वी ते वाढू शकते असा इशारा देऊन झेलेन्स्की ह्यांना संवादाचा विचार करण्यास भाग पाडले आहे. भारताने युक्रेनला मदत आणि युद्धानंतरच्या पुनर्बांधणीला पाठिंबा देण्याचे संकेतही दिले आहेत. या सर्व हालचालींची रशिया आणि अमेरिका आणि युरोपमधील इतर महत्त्वाच्या भागधारकांशी आगाऊ चर्चा करण्यात आली होती.

**भविष्यातील वाटचाल**

युरोपियन युद्धाभोवती भारताच्या मुत्सद्देगिरीच्या या भागातून तीन महत्त्वाचे मुद्दे काढले जाऊ शकतात. एक, भारताने शांतता मुत्सद्देगिरीचा अधिक सक्रिय आणि कमी जोखीमेचा पवित्रा स्वीकारला आहे, जो शास्त्रीय तटस्थतेच्या पलीकडे जातो, सक्रिय शांतता प्रस्थापित करण्यात सहभागी होण्याच्या इच्छेचा संकेत देतो. एखाद्या भारतीय पंतप्रधानाने प्रथमच दूरच्या संघर्षात सक्रिय युद्धक्षेत्रात पाऊल ठेवले. भारत कधीही तटस्थ नव्हता, तर शांततेची बाजू घेत होता, असे सुचवून मोदींनी या दृष्टिकोनाला ब्रँडिंग दिले आहे.

दोन, भारताने आधीच शांतता प्रस्थापित करण्यास सुरुवात केली आहे, दोन्ही युद्ध करणाऱ्या पक्षांना एकमेकांच्या दृष्टिकोणाची जाणीव करून दिली आहे. झेलेन्स्की यांना पुतीनसोबतच्या युद्धाबाबत मोदींच्या जुलैमध्ये झालेल्या संभाषणाची माहिती देण्यात आली होती. त्याचप्रमाणे, झेलेन्स्की ह्यांना मोदींच्या जुलै मधील पुतीन ह्याच्यासोबतच्या भेटीचे तपशील देण्यात आले होते. तसेच पुतीन ह्यांच्यापर्यंत मोदींच्या कीव भेटीच्या नोंदी पोहोचवण्यात आल्या होत्या. एवढेच नव्हे तर प्रत्यक्षात मोदींनी स्वत: पुतिन यांच्या भेटीनंतर त्यांच्याशी संवाद साधला. त्यांनी परत येताना युद्धाच्या प्रमुख पाश्चात्य भागीदार असलेल्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिडेन यांच्याशी देखील संवाद साधला. या संभाषणांचा एकत्रितपणे एक विश्वासार्ह शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न आहे, जरी त्यांचा वाढत्या युद्ध स्थितीवर अल्प परिणाम झाला असला तरीही. जर असे झाले, तर शांतता प्रक्रियेसाठी प्रस्ताव तयार करण्यासाठी भारताकडे पुरेसा वेळ असेल.

तीन, सकारात्मक भविष्यात केव्हातरी, भारत सर्व भागीदार राष्ट्रांना शांतता संवादासाठी तटस्थ व्यासपीठ प्रदान करू शकेल. या युद्धासाठी भारत जागतिक शांतता परिषदेचे आयोजनही करू शकतो. नक्की वेळेचा अंदाज बांधणे कठीण असले तरी; संघर्षाच्या शेवटासाठी नोव्हेंबरमध्ये अमेरिकन निवडणुकांची प्रतीक्षा करावी लागेल. सध्याच्या आंतरराष्ट्रीय गणितानुसार ट्रम्प ह्यांचे अध्यक्षपद युद्धाचा शेवट लवकर करू शकते. पण ट्रम्प किंवा हॅरिस व्हाईट हाऊस मध्ये यायची पर्वा न करता, भारत आता शांतता प्रक्रियेतील एक महत्त्वाचा भागधारक आहे.

युक्रेन संघर्षामुळे युरोपमध्ये दुसरे महायुद्ध किंवा त्याहून वाईट म्हणजे अण्वस्त्र भडकणार नाही, अशी जागतिक अपेक्षा आहे. जरी ह्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी दोन्ही पक्ष तयार झाले तरी, युक्रेनमधील शेवटची खेळी ही नक्की युद्धविराम, प्रदीर्घ 'गोठलेला' संघर्ष किंवा वाटाघाटीद्वारे शांतता तोडगा म्हणून येईल हे स्पष्ट नाही. हा संघर्ष सोडवण्यासाठी भारताने मुत्सद्देगिरीचे शिंग फुंकले असताना, अकारण वाढलेली भू-राजकीय रणधुमाळीने हा मार्ग खडतर होऊ शकतो. सध्या, भारताने स्वायत्त निर्णयासाठी जागा राखून ठेवली आहे; अलीकडच्या धोरणांमुळे रशिया आणि पाश्चिमात्य या दोन्ही देशांकडून भारतावरील दबाव कमी झाला आहे. भारताने दोन्ही बाजूंनी शस्त्रांची आयात सुरूच ठेवली आहे; रशियन तेल आणि पाश्चात्य तंत्रज्ञान दोन्ही सध्या प्रवाहित आहेत. भारत युद्धाच्या एका महत्वाच्या टप्प्याची, जिथे अमेरिका आणि रशिया दोघेही बंद रॅम्प, युद्धविराम आणि शेवटावर चर्चा करतील, धीराने वाट पाहत आहे. नोव्हेंबरमध्ये अमेरिकेच्या निवडणुकांनंतरच ती वेळ येऊ शकते. त्या परिस्थितीत, अगदीच स्वत:ची 'शांतता योजना' नसेल तरी कदाचित चर्चेसाठी व्यासपीठ उपलब्ध करून किंवा 'जागतिक शांतता शिखर परिषदेचे नियोजन करून भारताने शांतता प्रस्थापित करण्यात मोठी भूमिका बजावण्यासाठी तयार असले पाहिजे.

# भारताला नवीन राष्ट्रीय जल धोरणाची गरज

२०१९ मध्ये, भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाने नवीन राष्ट्रीय जल धोरणाचा मसुदा तयार करण्यासाठी मिहिर शाह यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र तज्ञांची एक समिती स्थापन केली होती. राष्ट्रीय जल धोरणाचा मसुदा जवळपास चार वर्षांपूर्वी सादर करण्यात आला होता. परंतु, तेव्हापासून आतापर्यंत मसुदा धोरण दस्तऐवजावर फारशी चर्चा झालेली नाही. यामुळे मिहीर शहा यांनी वर्णन केलेल्या जल व्यवस्थापनासाठी बहु-अनुशासनात्मक आणि बहु-भागधारक दृष्टिकोन असलेल्या नवीन जल प्रशासन पॅरॅडिमपासून भारत वंचित राहिला आहे.

**दृष्टीकोनांचे युद्ध**

गेल्या दशकभरामध्ये, भारताने जल प्रशासनामधील परस्पर विरोधी पॅरॅडिम्समधील संघर्ष अनुभवला आहे. एकीकडे, विद्यमान पाणी वितरणासाठी धरणे, बॅरेजेस आणि नद्या व इतर पाणवठ्यांवरील वाहिन्यांमधील संरचनात्मक हस्तक्षेपांद्वारे पाणीपुरवठ्यामध्ये वाढ करणाऱ्या योजनांवर भर देणाऱ्या कोलोनिअल इंजिनिअरिंग पॅरॅडिमचे समर्थन करण्यात, त्याचा अवलंब करण्यात आणि प्रसार करण्यात केंद्रीय जल आयोगासारख्या संस्था आघाडीवर आहेत. तर, दुसरीकडे अशा पारंपारिक विचारसरणीला अत्याधुनिक जल व्यावसायिकांनी आव्हान दिले आहे. अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक जल प्रशासनाच्या पॅरॅडिमचे समर्थन करणारे हे जल व्यावसायिक पर्यावरणीयदृष्ट्या माहितीने युक्त आहेतच पण त्यासोबत नवीन ज्ञानाच्या प्राप्तीसह उदयास येत आहे. या नवीन उदयोन्मुख पॅरॅडिमने एकात्मिक जल संसाधन व्यवस्थापन (इंटीग्रेटेड वॉटर रिसोर्स मॅनेजमेंट – आयडब्ल्यूआरएम) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नॉलेज बेस आणि आंतरविद्याशाखीय चौकटीला मूर्त रूप दिलेले आहे.

विद्यमान पाणी वितरणासाठी धरणे, बॅरेजेस आणि नद्या व इतर पाणवठ्यांवरील वाहिन्यांमधील संरचनात्मक हस्तक्षेपांद्वारे पाणीपुरवठ्यामध्ये वाढ करणाऱ्या योजनांवर भर देणाऱ्या कोलोनिअल इंजिनिअरिंग पॅरॅडिमचे समर्थन करण्यात, त्याचा अवलंब करण्यात आणि प्रसार करण्यात केंद्रीय जल आयोगासारख्या संस्था आघाडीवर आहेत.

नैसर्गिक परिसंस्थेची अखंडता लक्षात घेऊन पारंपारिक पाणी पुरवठा-वृद्धी योजनांमधून पाण्याची मागणी व्यवस्थापनाच्या नाविन्यपूर्ण पद्धतींकडे जाणारा हा पॅरॅडिम गेल्या पाच दशकांतील जागतिक प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करणारा आहे. १९७० च्या दशकापासून, पारंपारिक संरचनात्मक पॅरॅडिम्सचे बेसिन इकोसिस्टमवर होणारे हानिकारक परिणाम लक्षात घेत जागतिक जल व्यावसायिकांनी त्यांचे पालन करण्यावर शंका उपस्थित करण्यास सुरुवात केली आहे. युरोपियन युनियन (ईयू) आणि युनायटेड स्टेट्स (यूएस) ने नदी प्रणालीचे तुकडे करणाऱ्या व समुदायाच्या उपजीविकेचे अपरिवर्तनीय नुकसान करणाऱ्या मानववंशीय हस्तक्षेपांचे हानिकारक प्रभाव ओळखले आहेत. स्ट्रक्चरल हस्तक्षेपांमुळे नैसर्गिक परिसंस्थेची रचना आणि कार्ये बदलली आहेत. तसेच नदी खोऱ्यातील समुदायासाठी महत्त्वाच्या परिसंस्थेच्या सेवा (म्हणजेच, मत्स्यपालन, पाणी, हवामान नियंत्रण, कार्बन सिक्वेस्ट्रेशन इ. सारख्या मानवी समुदायाला इकोसिस्टमद्वारे प्रदान केलेल्या सेवा) प्रदान करण्याची इकोसिस्टमची क्षमता कमी झाली आहे.

जसजसे समस्येचे प्रमाण कालांतराने वाढत गेले आहे तसतशी सुधारात्मक पावले उचलण्यात आली आहेत. २००० मध्ये ईयूने वॉटर फ्रेमवर्क निर्देश स्वीकारल्यामुळे, फ्रान्स, स्वीडन, फिनलंड, स्पेन आणि युनायटेड किंगडममध्ये एका दशकात सुमारे ५००० संरचनात्मक हस्तक्षेप नष्ट करण्यात आले आहेत. देण्यात आलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने, ईयू सदस्य राष्ट्रांनी पाण्याच्या मागणीचे व्यवस्थापन करण्यासाठी (पुरवठा विकासाच्या विरूद्ध), त्यास प्रोत्साहन देण्यासाठी आणि पाण्याचा प्रवाह अखंड ठेवण्यासाठी नैसर्गिक जलविज्ञान प्रवाह व्यवस्था वापरण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे नद्या आणि जलस्रोतांचे पर्यावरणीय आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे. त्याचप्रमाणे, एकेकाळी हूवर डॅम आणि टेनेसी व्हॅली प्रकल्पांसारख्या अभियांत्रिकी चमत्कारांच्या निर्मितीचे उदाहरण असलेल्या संरचनावादी विचारसरणीचा सर्वात मोठा प्रवर्तक असलेल्या यूएसने अलीकडच्या दशकात नद्यांवरील अशा १००० पेक्षा अधिक संरचना काढून टाकल्या.

२००० मध्ये ईयूने वॉटर फ्रेमवर्क निर्देश स्वीकारल्यामुळे, फ्रान्स, स्वीडन, फिनलंड, स्पेन आणि युनायटेड किंगडममध्ये एका दशकात सुमारे ५००० संरचनात्मक हस्तक्षेप नष्ट करण्यात आले आहेत.

हा उपाय केवळ धरणे काढून टाकणे आणि निकामी करण्यापुरता मर्यादित नाही. नद्यांमध्ये पाणी साठवण्यासाठी संस्थात्मक दृष्टिकोनही वापरला जात आहे. उदाहरणार्थ, चिलीने १९८१ ची राष्ट्रीय जल संहिता लागू करत पाण्याच्या अधिकारांचा व्यापार जमिनीच्या मालकीपासून वेगळा केला आहे. शेतकऱ्यांना पाण्याची उत्पादकता वाढवण्यासाठी आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनात योगदान देण्यासाठी ऑस्ट्रेलियातील मरे-डार्लिंग बेसिनवर वॉटर मार्केटची स्थापना करण्यात आली आहे. यातील सर्वात अलीकडील उदाहरण म्हणजे कॅलिफोर्नियामध्ये वॉटर डेरिव्हेटिव्ह ट्रेडिंगची सुरुवात ही आहे. २०१९ मध्ये शिकागो मर्केंटाइल एक्सचेंज प्लॅटफॉर्मद्वारे पश्चिम यूएसमधील पाण्याच्या उपलब्धतेचे धोके कमी करण्यासाठी वॉटर डेरिव्हेटिव्ह ट्रेडिंगची सुरुवात करण्यात आली होती.

**भारतातील ट्रेंड**

या जागतिक प्रवृत्तीला आणि बदलाला विरोध करत, भारताच्या जल तंत्रज्ञानाने उदयोन्मुख नवीन पॅरॅडिम्सकडे वळण्यास विरोध केला आहे. जल संसाधन विकासाच्या अनेक कालबाह्य संकल्पनांना चिकटून राहणाऱ्या व दीर्घकालीन शाश्वततेच्या मुद्द्यांऐवजी त्वरित आर्थिक नफ्याला प्राधान्य देणाऱ्या या हायड्रो-टेक्नोक्रसीने नवीन पॅरॅडिम्सकडे जाण्याच्या प्रत्येक प्रयत्नाला जोरदार विरोध केला आहे. असे असले तरी गेल्या दशकामध्ये सर्वसमावेशक जल प्रशासनाकडे जाण्यासाठी मार्गदर्शक ठरणारे उपक्रमही राबवले जात आहेत. यामध्ये नॅशनल वॉटर फ्रेमवर्क बिल २०१६ (एनडब्ल्यूएफबी) आणि मॉडेल बिल फॉर द कंझर्वेशन, प्रोटेक्शन, रेग्युलेशन अँड मॅनेजमेंट ऑफ ग्राऊंडवॉटर या दोन विधेयकांचा समावेश आहे. त्याच वर्षी, अ ट्वेंटी फर्स्ट सेंच्युअरी इंस्टिट्युशनल आर्किटेक्चर फॉर इंडियाज वॉटर रिफॉर्म्स या शीर्षकाचा अहवाल देखील प्रकाशित झाला आहे. केंद्रीय जल आयोग (सीडब्ल्यूसी) आणि सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्ड (सीजीडब्ल्यूबी) सारख्या विद्यमान प्रशासकीय संस्था बरखास्त करून एकात्मिक राष्ट्रीय जल आयोग स्थापन करण्याची शिफारस करणाऱ्या अहवालाला या क्षेत्रातील महत्त्वाची संस्था व भारतातील जल प्रशासन प्रणालीवर वर्चस्व गाजवणारी संस्थात्मक विचार प्रक्रिया असलेल्या हायड्रो-टेक्नोक्रसीने प्रचंड विरोध केला आहे. मिहीर शहा यांनी विविध वर्तमानपत्रांमध्ये लिहीलेल्या लेखांमध्ये असे नमुद केले आहे की नॅशनल वॉटर पॉलिसी २०२० हा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. असे असले तरी, हा दस्तऐवज फार आधीच सरकारला सादर करण्यात आला असला तरी त्यावर कोणतीही कार्यवाही अद्याप झालेली नाही.

मिहीर शहा यांनी विविध वर्तमानपत्रांमध्ये लिहीलेल्या लेखांमध्ये असे नमुद केले आहे की नॅशनल वॉटर पॉलिसी २०२० हा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे.

**नवीन राष्ट्रीय जल धोरणाबाबत काय अपेक्षा आहेत ?**

नवीन राष्ट्रीय जल धोरण हे भारताच्या जल धोरणाच्या स्पेक्ट्रममध्ये बदल घडवून आणणारे आहे, असे मिहीर शाह यांनी लिहिलेल्या ओपे-एड्सच्या मालिकेतून सूचित करण्यात आले आहे. कोलोनिअल इंजिनिअरिंग पॅरॅडिमद्वारे प्रसारित करण्यात आलेल्या कालबाह्य मायोपिक विचार प्रक्रियेचा मोठा फटका भारतातील हिमालयीन आणि द्विपकल्पिय नद्यांना बसलेला आहे. कोलोनिअल इंजिनिअरिंग पॅरॅडिममुळे पाण्याबाबतची असुरक्षितता वाढेल आणि भविष्यामध्ये विकासाशी संबंधित आव्हानांना तोंड देण्यामध्ये अडथळा येईल हे आंतरराज्यीय कावेरी संघर्ष आणि संघर्षावरील न्यायाधिकरणाच्या अंतिम निवाड्याशी संबंधित समस्या, पश्चिम बंगालमधील फरक्का बॅरेजमुळे बिहारमध्ये आलेला पुर आणि नदी जोड प्रकल्पांचे पर्यावरणीय परिणाम यावरून स्पष्ट झाले आहे. नवीन उदयोन्मुख पॅरॅडिम आत्मसात केल्याने सामान्य जल व्यवस्थापन आणि विशेषत: नदी खोऱ्यांचे प्रशासन समाविष्ट असलेल्या जल प्रशासन प्रणालीसंबंधीचा दृष्टीकोन प्रस्तुत करण्यात मदत होऊ शकेल.

ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशनने नुकत्याच प्रकाशित केलेल्या एका पेपरमध्ये आयडब्ल्यूआरएममधील तत्त्वांचा सारांश देण्यात आला आहे तसेच नवीन राष्ट्रीय जल धोरणात त्यांचा समावेश करण्याच्या गरजेवर जोर देण्यात आला आहे. ती तत्वे पुढीलप्रमाणे –

१. पाणी हा ऑरगॅनिक इको-हायड्रोलॉजिकल सायकलचा अविभाज्य घटक आहे आणि त्याकडे प्रवाह या संज्ञेच्या दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. मानवी गरजा आणि सोयीनुसार साठवून ठेवण्याचा आणि वापरण्याचा हा संसाधन साठा नाही.

२. पाण्याचे आंतरिक मूल्य त्याच्या पर्यावरणीय वापरासह त्याच्या विविध उपयोगांद्वारे समजून घेणे आवश्यक आहे. पाणी आणि त्याच्या प्रवाहाशी संबंधित आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि इकोसिस्टम सेवांचे मूल्यांकन समाविष्ट असलेल्या सर्वांगीण आणि एकात्मिक मूल्यांकन फ्रेमवर्कद्वारे हे शक्य झाले आहे.

३. म्हणून, पाण्याकडे आर्थिक हित म्हणून पाहणे गरजेचे आहे, त्याचा न्याय्य आणि शाश्वत वापर सुनिश्चित करण्यासाठी त्याचे मूल्य ओळखण्यासाठी योग्य संस्थात्मक यंत्रणा स्थापन करणे आवश्यक आहे.

४. समानता आणि वितरणात्मक न्याय महत्त्वाचा आहे, आणि म्हणूनच मानवी मूलभूत गरजा या सुलभता सुनिश्चित करून पूर्ण करणे गरजेचे आहे.

५. नदीच्या खोऱ्यास प्रशासनाचे मूलभूत एकक म्हणून पाहिले जावे.

६. टंचाई आणि हवामान बदलाच्या परिस्थितीत पाण्याची उपलब्धता वाढवण्याचे कार्य म्हणून आर्थिक वाढ किंवा अन्न सुरक्षा या दोन्ही गोष्टींचा विचार केला जाऊ शकत नाही. त्याऐवजी, इतर विविध माध्यमांद्वारे मागणी व्यवस्थापनाकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

७. प्रकल्पाचे फायदे, वेळ, क्षेत्र तसेच त्यासाठीचा अतिरिक्त खर्च यांचा विचार करून जल विकास प्रकल्पांचे सर्वसमावेशक मूल्यमापन करणे महत्त्वाचे आहे.

८. जलस्रोतांच्या सामाजिक, पर्यावरणीय आणि आर्थिक भूमिका समजून घेण्यासाठी आणि त्यातील ट्रेड ऑफ समजून घेण्यासाठी एक भक्कम पाया, ज्ञानाचा आधार आणि पारदर्शक आणि बहुविद्याशाखीय भांडार महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकेल.

९. दुष्काळ आणि पूर यांच्याकडे आपत्कालीन घटना म्हणून न पाहता त्यांस जागतिक पर्यावरण-जलविज्ञान चक्राचे अविभाज्य घटक म्हणून पाहणे गरजेचे आहे.

१०. पाण्याची तरतूद, व्यवस्थापन आणि सुरक्षेमध्ये स्त्रिया या मध्यवर्ती भूमिका बजावतात, हे अधोरेखित करणाऱ्या डब्लिन स्टेटमेंटमध्ये जल व्यवस्थापनामध्ये जेंडर कन्सिडरेशन्स महत्त्वाची आहेत हे ठळकपणे नमुद करण्यात आले आहे.

प्रकल्पाचे फायदे, वेळ, क्षेत्र तसेच त्यासाठीचा अतिरिक्त खर्च यांचा विचार करून जल विकास प्रकल्पांचे सर्वसमावेशक मूल्यमापन करणे महत्त्वाचे आहे.

या आधी नमुद केल्याप्रमाणे, आता नवीन पॅरॅडिम उदयास येत आहे आणि विकसित होण्यासाठी ही पॅरॅडिम्स धोरण चौकटीबाबत विस्तृत मार्गदर्शक तत्त्वेही प्रदान करत आहे. त्यामुळे, वरील मुद्द्यांना सर्वसमावेशक मानले जाऊ शकत नाही आणि भविष्यातील आव्हानांची चांगली समज आणि कालांतराने विकसित होणारे ज्ञान यामुळे या विषयाबाबतच्या समजामध्ये बदल होत जाणार आहे. उदयोन्मुख पॅरॅडिमच्या विस्तृत स्वरूपाकडे पाहता, वरील पॉइंटर्समधून सध्याचे अत्याधुनिक विचार प्रतिबिंबित झाले आहेत. या लेखात लेखकाने २०२० मध्ये राष्ट्रीय जल धोरण मसुदा समितीसमोर हे मुद्दे मांडले आहेत आणि नवीन राष्ट्रीय जल धोरणामध्ये हे मुद्दे याआधीच स्वीकारले गेले असतील अशी अपेक्षा आहे. जर या धोरणावर उघडपणे चर्चा झाली किंवा त्यावर विचारमंथन झाले तरच हे मुद्दे स्विकारले गेले आहेत की नाही हे स्पष्ट होण्यास मदत होईल. जल प्रशासन आणि सुरक्षा हे भारतासमोरील एक मोठे विकासात्मक आव्हान आहे. हे आव्हान जर आता प्रभावीपणे हाताळले नाही तर भारतीय अर्थव्यवस्थेसमोर भविष्यात एक मोठे आव्हान उभे राहिल, हे समजून घेणे आवश्यक आहे.

## नवीन विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या नावासाठी प्रयत्न करणार- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

### वारकऱ्यांना आवश्यक सोई-सुविधा देण्याचा प्रयत्न- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी
■ पुणे

पुण्यातील नवीन विमानतळाचे काम चांगले झाले असून या नवीन विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे नाव देण्याबाबतच्या प्रस्तावाला मंजुरीसाठी प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.



भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्यावतीने महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कमिन्स महाविद्यालय, कर्वेनगर येथे आयोजित जिल्ह्यातील विविध प्रकल्पांच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, आमदार उमा खापरे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, प्राधिकरणाचे मुख्य प्रबंधक अंशुमाली श्रीवास्तव, प्रकल्प संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री गडकरी म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. आपला इतिहास, संस्कृती आणि वारसा यादृष्टीने महाराष्ट्राचे एक वेगळेपण असून संत महापुरुषांच्या ग्रंथानी, ओव्यांनी आपले जीवन समृद्ध आणि संपन्न केले आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग हे भक्तीमार्ग असून या मार्गाने लाखो वारकरी पायी जातात. वारकऱ्यांच्या सुविधेच्या अनुषंगाने दोन्ही पालखी मार्गाकरीता सुमारे १२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या मार्गावर संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, श्री विठ्ठल यांच्या प्रतिकृती, विजेची व्यवस्था, वृक्षाची पुर्नलागवड तसेच सुमारे ४२ हजार नवीन झाडे लावण्यात आली आहेत. आगामी काळात स्वयंसेवी संस्था आणि वारकऱ्यांनी या मार्गावर वृक्षारोपण करुन येत्या काळात हरित महामार्ग करण्याकरीता सहकार्य करावे.

एनएचएआयमार्फत नाशिक फाटा ते खेड, हडपसर ते यवत, कात्रज बोगदा ते रावेत, तळेगाव-चाकण-शिक्रापूर, पुणे ते शिरुर, पुणे ते छत्रपती संभाजीनगर अशी विविध विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. येत्या डिसेंबरपर्यंत पुणे शहर आणि जिल्ह्यात १ लाख ५० हजार कोटी रुपयांची कामे सुरू करण्यात येतील. याशिवाय पुणे ते सातारा महामार्गाचा नवीन विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करुन कामे करण्यात येतील.

## केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे कारखान्यांना 10 हजार कोटींचा फटका

### शंकरराव गडाख यांचा आरोप

प्रतिनिधी
■ अहमदनगर

केंद्र सरकारच्या साखर निर्यात बंदीचा तोटा शेतकऱ्यांना बसला असून आयात निर्यातीच्या चुकीच्या धोरणामुळे साखर कारखान्यांना तब्बल दहा हजार कोटीचा फटका सहन करावा लागत असल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार शंकरराव गडाख यांनी केला आहे. सोनई येथील मुळा सहकारी साखर कारखान्याच्या 54 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते.

सोनई येथील मुळा सहकारी साखर कारखान्याच्या 54 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी साखर कारखान्याचे अध्यक्ष नानासाहेब तूवर होते. यावेळी आमदार शंकरराव गडाख यांनी केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणावर बोट ठेवले. “केंद्र सरकारने पाच वर्षात पाच वेळा एफ आर पी वाढवली. त्या तुलनेत साखरेचे किमान दर वाढवले नाहीत. साखर निर्यात बंदीमुळे सध्या साखर कारखान्याच्या गोदामध्ये मोठ्या प्रमाणात साखर पडून आहे. निर्यात बंदी तातडीने उठवून 25 ते 30 लाख टन साखर निर्यात करणे गरजेचे आहे.



केंद्राने इथेनॉल प्रकल्पासाठी परवानगी दिल्या, मात्र जाचक अटींमुळे प्रकल्प अडचणीत आला आहे. असे शंकरराव गडाख म्हणाले. साखर कारखानदारी व शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी, साखरेचे किमान दर 4 हजार 200 च्या पुढे आवश्यक आहे. सध्या सगळीकडे धरणे भरली असून ऊस उत्पादन मोठ्या प्रमाणात होणार आहे. साखरेची गोदामे मोठ्या प्रमाणात भरली जाणार आहेत. असे असताना केंद्राच्या चुकीच्या धोरणाचा फटका शेतकऱ्यांना बसला असून केंद्राने तातडीने निर्णय घ्यावा अन्यथा दहा हजार इतका अधिकचा तोटा भविष्यात पुन्हा साखर कारखानदारीला सहन करावा लागेल, असे गडाख यांनी सांगितले.

## मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर आ. भोंडेकरांना आधी 'नो एन्ट्री' मग 'एन्ट्री'

प्रतिनिधी
■ नागपूर

शिवसेना शिंदे गटाचे समर्थक भंडाऱ्यातील अपक्ष आमदार नरेंद्र भोंडेकर यांना नागपुरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे त्यांना परत जावे लागले. नागपुरातील 'रामगिरी' या मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानाचे गेट न उघडल्याने त्यांना परत जावे लागले, आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी स्पष्टीकरण दिले. त्या ठिकाणी काय घडले? ते त्यांनी सांगितले.

आमदार नरेंद्र भोंडेकर म्हणाले, मी रामगिरी बंगल्यावर गेलो होता. त्याच्या आधी माझी विमानतळावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेट झाली. मी त्यांना सांगितले होते की, तुम्ही बंगल्यावर गेल्यावर मी भेटायला येतो. त्यानुसार मी बंगल्यावर गेलो. बंगल्याच्या गेटवर गेल्यानंतर पीआयने सांगितले की, साहेब आराम करत आहेत. त्यांनी कोणालाच भेटायला नाही सांगितले आहे. मी म्हटले, ठीक आहे आणि त्या ठिकाणावरुन निघालो. परंतु दहा मिनिटांतच मला साहेबांचा फोन आला. ते म्हणाले, नरेंद्र काही काम असेल तर ये. त्यानंतर मी त्यांच्या बंगल्यावर गेलो. दोन तास बसलो होतो. सोबत आम्ही जेवणही केले. साहेब तसे कोणाची भेट नाकारत नाही. मग ते माझी भेट कशाला नाकारतील, असे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी सांगितले.



आमदार नरेंद्र भोंडकर म्हणाले, किशोरी पेडणेकर भंडाऱ्यात शिंदे साहेबांनी माझी भेट नाकारल्याची चुकीची माहिती दिली.त्या अर्धवट माहिती घेतात. किशोरी ताई तुम्हाला माहिती नसते तर तुम्ही का बोलतात? त्यावेळी उद्धव ठाकरेसुद्धा फोन उचलत नव्हते. आम्ही विकास निधी नाही आणला तर लोकांना न्याय कसे देणार? तुमच्या पक्षाच्या चिन्हावर आम्ही आलोत का? तुम्ही आम्हाला तिकीट दिली का? बोलताना तुम्हाला थोडे तरी वाटायला पाहिजे, असे पेडणेकर यांनी त्यांच्यावर केलेल्या टीकेवर त्यांनी उत्तर दिले.

मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द नक्कीच ते पूर्ण करतील. आता निवडणुका जवळ आलेल्या आहेत. त्यामुळे मंत्रिपद मागून बघून काही होणार नाही. पण आता शेवटच्या पंधरा-वीस दिवसांमध्ये किती चांगले काम मतदारसंघासाठी करता येतील यावर आमचा फोकस आहे, असे आमदार नरेंद्र भोंडकर यांनी सांगितले.

## नाशिकमध्ये 5 पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास बंदी

### आजपासून 15 दिवस मनाई आदेश

प्रतिनिधी
■ नाशिक

नाशिक शहरात आजपासून पुन्हा मनाई आदेश लागू झाले आहेत. २१ सप्टेंबर ते ०५ ऑक्टोबरपर्यंत १५ दिवसांसाठी शहरात मनाई आदेश लागू आहेत. आजपासून १५ दिवस नाशिक शहरात पोलिसांकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. नेमकं हे आदेश का देण्यात आले आहेत? यामागे काय कारण आहे, हे आपण सविस्तर जाणून घेवू या.

शहरातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडू नये, यासाठी प्रशासनाने २१ सप्टेंबर ते ०५ ऑक्टोबर दरम्यान महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार मनाई आदेश लागू केले आहेत.



राज्यातील राजकीय घडामोडींमुळे सत्ताधारी आणि विरोधी पक्षांत आरोप-प्रत्यारोप होत आहेत. त्याचप्रमाणे सण उत्सवामध्ये मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शहरात शांतता राहावी, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी १५ दिवसांसाठी शहरात मनाई आदेश लागू केले असल्याचं समोर आलंय.

आगामी सण-उत्सव, आरक्षणाचा मुद्दा, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तयार झालेलं राजकीय वातावरण आणि अन्य कारणांवरून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी निर्णय घेण्यात आलाय. मनाई आदेशाच्या कालावधीत पोलिसांच्या परवानगीशिवाय कुठल्याही प्रकारचे आंदोलन अथवा निदर्शनं करता येणार नाही.

२१ सप्टेंबर ते ०५ ऑक्टोबरपर्यंत दरम्यान स्फोटक पदार्थ, शस्त्र बाळगण्यास, शस्त्र जमा करण्यास अथवा विक्री करण्यास मनाई आहे. मनाई कालावधीत प्रतीकात्मक चित्रं, पुतळ्याचे दहन, घोषणा देणं , आक्षेपार्ह वक्तव्य करण्यास देखील सक्त मनाई आहे. ५ पेक्षा जास्त लोक एकत्र येण्यासाठी पोलीस आयुक्तांची परवानगी आवश्यक आहे. विना परवानगी मोर्चे, आंदोलनांना मनाई देखील या १५ दिवसांमध्ये करण्यात आलीय.

## नवरात्रोत्सवात सप्तश्रृंगी देवीचं मंदिर राहणार 24 तास खुलं

■ नाशिक

नवरात्रोत्सव काळामध्ये साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनासाठी देशभरातून भक्तगण वणी येथे येतात. याच पार्श्वभूमीवर सप्तश्रृंगी देवीच्या भाविकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आलीय. नवरात्रोत्सवात गडावर भाविकांची संख्या लाखोंमध्ये असते. एकाचवेळी अनेक भाविक गडावर जमतात. त्यामुळे भाविकांची मोठी गर्दी या नऊ दिवसांमध्ये असते. सप्तशृंगी देवीच्या भाविकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. नवरात्रौत्सव काळात सप्तशृंगी देवीचं मंदिर भाविकांना दर्शनासाठी २४ तास खुलं राहणार आहे. ०३ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर दरम्यान मंदिर भाविकांना दर्शनासाठी २४ तास खुलं राहणार आहे. नवरात्रौत्सव काळात देवीच्या दर्शनासाठी भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता भाविकांच्या सुलभ दर्शनासाठी निर्णय घेण्यात आलाय. गडावर देवीच्या मंदिरात जाणारी फनिक्युलर ट्रॉली देखील २४ तास कार्यान्वित असणार आहे. मंदिर गाभाऱ्यात फनिक्युलर ट्रॉलीने येणाऱ्या भाविकांना ३० टक्के तर पायरीने येणाऱ्या भाविकांना ७० टक्के प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला गेलाय. परंतु नवरात्रौत्सव काळात नांदुरी ते सप्तशृंगी गडादरम्यान खासगी वाहतूक देखील बंद राहणार आहे. १०० एसटी बसेसच्या माध्यमातून नांदुरी ते सप्तशृंगी गड भाविकांची वाहतूक करण्याचं नियोजन आहे.

## राहुल गांधींनी सीए ॲनाच्या आई-वडिलांशी व्हिडिओ कॉलद्वारे साधला संवाद

प्रतिनिधी
■ पुणे

अर्न्स्ट अँड यंग इंडियाच्या 26 वर्षीय चार्टर्ड अकाउंटंट (CA) एना सेबॅस्टियन यांचे 20 जुलै रोजी निधन झाले. अहवालानुसार, कामाच्या ताणामुळे त्यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला.

राहुल गांधी यांनी शनिवारी एनांच्या कुटुंबीयांशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला. यावेळी त्यांनी हा मुद्दा नक्कीच मांडणार असल्याचे सांगितले.

राहुल यांनी एआयपीसीचे अध्यक्ष प्रवीण चक्रवर्ती यांना अण्णांच्या स्मरणार्थ जनजागृती मोहीम सुरू करण्याचे निर्देश दिले, जेणेकरून कष्टकरी लोकांच्या हिताचे रक्षण करता येईल.



कॉर्पोरेट व्यावसायिकांसाठी काँग्रेस लवकरच हेल्पलाइन क्रमांक जारी करणार असल्याचे राहुल म्हणाले. यामध्ये कामाचा ताण आणि कार्यसंस्कृती या विषयांवर चर्चा करता येईल. यामुळे कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या अडचणी दूर होतील.

5 डे वीकचा प्रस्ताव मी संसदेत ठेवणार केरळमधील काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी शनिवारी सेबॅस्टियन यांच्या वडिलांशी संवाद साधला. संसदेच्या पुढील अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करणार असल्याचे थरूर यांनी सांगितले. मी सरकारी आणि खाजगी कार्यालयात आठवड्यातून 5 कामकाजाचे दिवस आणि दररोज 8 तासांसाठी कॅलेंडर जारी करण्याची शिफारस संसदेत करेन. कामाच्या ठिकाणी अमानुष कृत्य करणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. येथे मानवी हक्कांचे उल्लंघन होता कामा नये. केरळच्या असलेल्या सीए एना 19 मार्च रोजी अर्न्स्ट अँड यंग कंपनीत रुजू झाल्या. 6 जुलै रोजी आई-वडील पुण्यात तिला भेटायला आले असता त्यांनी छातीत दुखत असल्याची तक्रार केली. डॉक्टरांनी पाहिल्यानंतर कार्यालयातील कामाच्या ताणामुळे त्या चिंतेत असल्याचे दिसून आले.

त्यांच्या पालकांचे म्हणणे आहे की, त्यांची मुलगी डॉक्टरांना भेटून कार्यालयात परतली होती. रात्री उशिरा घरी आली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा निघून गेली.

## प्रेयसीच्या कुटुंबाकडून झालेल्या मारहाणीत प्रियकराचा मृत्यू

प्रतिनिधी
■ धुळे

धुळे जिल्ह्यात एका तरूणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आलीय. प्रेयसीला तिच्या घरी भेटायला गेला. त्यामुळे तरूणाला प्रेयसीच्या कुटुंबीयांनी जबर मारहाण केली. या घटनेत तरूणाचा मृत्यू झाल्याचं समोर आलंय. ही घटना साक्री तालुक्यात घडल्याची माहिती मिळतेय. आपण या घटनेबद्दल सविस्तर जाणून घेवू या.

धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यातील निजामपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये प्रियकराला प्रेयसीच्या घरी जाऊन भेटणं जीवावर बेतलं आहे. प्रेयसीने भेटायला बोलावलं म्हणून तरूण तिच्या घरी भेटायला गेला. परंतु याची भनक प्रेयसीच्या घरच्यांना लागल्यानंतर संतापलेल्या प्रेयसीच्या कुटुंबीयांनी प्रियकराला बेदम मारहाण केली असता या मारहाणीमध्ये प्रियकराचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

अजय भवरे (वय-२०) असं मयत प्रियकराचे नाव आहे. संबंधित मुलीचे आणि मयत युवकाचे प्रेम संबंध असताना, मुलीनेच आपल्याला भेटायला बोलावले असल्याची जबाब मृत्यूपूर्वी प्रियकराने पोलिसांना दिलाय. डोक्याला जबर मारहाण झाल्यामुळेच युवकाचा उपचारादरम्यान रुग्णालयामध्ये दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर मृत्यूमुखी पडलेल्या युवकाच्या कुटुंबीयांनी आणि परिसरातील नागरिकांनी निजामपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये ठिय्या मांडला.

मारेकऱ्यांना तात्काळ अटक करत त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करा, अशी मागणी मृत तरूणाच्या कुटुंबीयांनी केलीय. निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील कारवाई करीत आहेत.

## जरांगेंच्या समर्थनार्थ धाराशिव बंद

प्रतिनिधी
■ धाराशिव

ओबीसी प्रवर्गातूनच मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे, या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्यावतीने शनिवारी धाराशिव जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. या बंदच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मराठा समाजबांधवांनी समर्थन दिले. दरम्यान या बंदला जिल्ह्यातील धाराशिवसह, परंडा, भूम, वाशी, कळंब, उमरगा, लोहारा, तुळजापूर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील व्यापारी, शाळा, महाविद्यालयांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे, यासाठी अंतरवाली सराटी येथे अमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाला संपूर्ण मराठा समाजाचे समर्थन आहे. उपोषणाच्या समर्थनार्थ शनिवार जिल्हा बंद ठेवून मागणीचे निवेदन सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने महसूल प्रशासनामार्फत देण्यात आले.

मराठा समाजाला ओबीसी वर्गातून आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या वर्षभरापासून लढा सुरु केला आहे. सुरुवातीला आंदोलन केल्यानंतर सत्तेतील विविध मंत्र्यांनी भेटी देऊन आरक्षण देण्याचा शब्द दिला होता. यानंतर मुंबईवर मोर्चा काढल्यानंतर खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी – सगेसोयरेची अधिसूचना काढून त्याची अंमलबजावणी करण्याचा शब्द दिला होता.

## आमिर खान घेणार शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी पुढाकार

### डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात साधला संवाद

प्रतिनिधी
■ अकोला



बॉलीवूड स्टार आणि 'मिस्टर परफेक्शनिस्ट' अभिनेता आमिर खाने आज अकोल्यात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाला भेट दिली. त्यांनी विविध प्रक्षेत्रांना भेटी देत शेतीतील नवे तंत्रज्ञान जाणून घेतलं. यावेळी त्यांनी पाणी फाउंडेशन चळवळीत योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचं ते म्हटल आहे. गुलाबी कलरचा कुर्ता आणि डोक्यावर गांधी टोपी अशा पेहरावात आमिरने शेतकरी आणि शास्त्रज्ञांची संवाद साधला. आमिर खान यांनी आपल्या भाषणात त्यांनी कोरोना काळात सोयाबीन उत्पादन वाढीसाठी 'पाणी फाऊंडेशन'च्या शेतीशाळेचा प्रवास उलगडला. सोयाबीनपासून सुरू झालेला प्रवास आता 26 पिकांच्या उत्पादन वाढीच्या शेतीशाळांपर्यंत गेल्याचं ते म्हणालेय. दरम्यान, राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचं ते म्हटले. भविष्यात आपल्या फाऊंडेशनच्या माध्यमातून या कामात पुढाकार घेणार असल्याचं ते म्हणालेय. आमिर खान हे त्यांच्या अभिनयासह त्यांच्यातील संवेदनशीलपणासाठी ओळखले जातात. अभिनेत्यापलिकडचा संवेदनशील माणूस आज अकोल्यात शेतकरी आणि सर्वसामान्य लोकांना पहायला मिळाला. जागतिक हवामान बदल आणि व्यावसायिक स्पर्धेच्या काळात अत्याधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक पद्धती, कृषिमाल प्रक्रियेसह विपणन क्षेत्रातील अद्ययावत माहिती शेतकऱ्यांपुढे मांडण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात तीन दिवसीय खर खरीप शिवार फेरी आयोजित करण्यात आली आहे.

## कौटुंबिक वादातून सख्या भावानेच भावाला सुरीने भोसकले

प्रतिनिधी
■ राजापूर

कौटुंबिक वादातून सख्या भावानेच आपल्या भावावर सुरीने भोसकून ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने चांगलीच खळबळ उडाली आहे. ही घटना राजापूर तालुक्यातील काजीर्डा राणेवाडी येथे शुक्रवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शुक्रवारी दुपारी काजीर्डा राणेवाडी येथील बाळकृष्ण आत्माराम राणे (वय ७२) आणि त्यांचा सख्खा भाऊ शांताराम आत्माराम राणे (वय ५६ ) यांच्यात घरगुती कारणावरून वाद सुरू झाले. या दोघांमध्ये सुरु झालेले वाद इतके शिगेला पोहोचले की, बाळकृष्ण राणे यांनी रागाच्या भरात आपल्या सख्ख्या भाऊ शांताराम राणे यांना सुरीने भोसकले. त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. यामध्ये शांताराम राणे हे गंभीर जखमी झाले असून त्यांना तात्काळ उपचारासाठी राजापूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणाची फिर्याद रामचंद्र चंद्रकांत अर्डे (वय ३०) याने राजापूर पोलीस ठाण्यात दिली. या फिर्यादीनुसार बाळकृष्ण राणे यांच्यावर भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ चे कलम १०९ प्रमाणे राजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाळकृष्ण आत्माराम राणे यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## आरक्षणासाठी धनगर समाज आक्रमक नेवासे फाट्यावर मेंढ्यांसह तासभर रास्ता रोको

### एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी

प्रतिनिधी
■ अहमदनगर

धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी शनिवारी दुपारी धनगर समाजाच्या वतीने मेंढ्यासह नेवासे फाटा येथे तासभर रास्ता रोको आंदोलन केले.

एसटी वर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी चार दिवसांपासून उपोषण सुरू आहे. त्याची गांभीर्याने दखल घेतली जात नसल्याने शनिवारी दुपारी धनगर समाजाच्या वतीने नगर - संभाजीनगर महामार्गावरील नेवासे फाट्यावर त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाजवळ तासभर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. महसूल यंत्रणेकडून आंदोलकांचे निवेदन स्वीकारण्यात आल्यानंतर हे आंदोलन थांबवण्यात आले आहे.



रास्ता रोको थांबवण्यात आला असला तरी उपोषण मात्र सुरूच राहणार आहे.

धनगर समाजाला एसटी वर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी नेवासे फाट्यावर या समाजाचे प्रमुख कार्यकर्ते उपोषणास बसले आहेत. यामध्ये छत्रपती संभाजीनगरचे प्रल्हाद सोरमारे, पाथर्डीचे राजू तागड, बाळासाहेब कोळसे, जालन्याचे रामराव कोल्हे, अंबडचे भगवान भोजने व जामखेडचे देविलाल मंडलीक यांचा समावेश आहे. शनिवार हा उपोषणाचा चौथा दिवस आहे. या उपोषणाची दखल घेतली जात नसल्याने शनिवारी धनगर समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. समाजाचे नेते अशोक कोळेकर यांचे यावेळी भाषण झाले. मंडळ अधिकारी सरिता मुंडे यांनी यावेळी निवेदन स्वीकारले.

पोलिस निरीक्षक धनंजय जाधव यावेळी उपस्थित होते. मेंढ्या व शेळ्यांसह आंदोलकांनी रास्ता रोको आंदोलन केले. त्यामुळे तासभर नगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. त्यामुळे वाहनचालकांना रस्त्यावर अडकून पडावे लागले. या आंदोलनात जिल्ह्यातील धनगर समाजबांधव सहभागी होते.

## मारवाडी फाउंडेशनच्यावतीने आठवलेंचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने होणार सन्मान


### आज नागपूर येथे नितीन गडकरींच्या हस्ते होणार पुरस्कार वितरण

प्रतिनिधी
■ नागपूर



मारवाडी म्हणून ओळखल्या जाणा-या समाजाने केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात कार्यकर्तुत्वाचा ठसा उमटविला आहे. ही गौरवगाथा सर्वसमावेशक, अधिकाधिक व्यापक, चैतन्यदायी व सामाजिक बांधीलकीच्या मार्गाने प्रेरणादायी बनविण्याचा प्रयत्न म्हणून महामानव भारतरत्न डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी त्यांच्या नावाने राष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात आपल्या अलौकिक कार्याचा ठसा उमटविणा-या व्यक्तीला तसेच त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन कार्य करणा-या मान्यवराला दरवर्षी मारवाडी फाऊंडेशनच्या वतीने 5 लाख रुपये रोख, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन त्याचा गौरव करीत असतो. यंदा सन 2024 चा भारतरत्न डॉं. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांना देऊन गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार सोहळा रविवार 22 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 11 वाजता बॅनियन हॉल, चिटणवीस सेंटर सिव्हील लाईन्स, नागपुर येथे आयोजित करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते व माजी खासदार प्रदिप गांधी यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार प्रदान करण्यात येईल. सभारंभाला नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मारवाडी फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## डायबिटीज पेशेंट नवरात्रि व्रत के दौरान रखें इन बातों ध्यान, बनी रहेगी सेहत



शारदीय नवरात्रि का त्योहार आज से यानी 26 सितंबर से शुरू हो गया है। नौ दिनों तक चलने वाले इस त्योहार में देवी के अलग-अलग रूपों की पूजा की जाती है। इस दौरान लोग व्रत भी रखते हैं। आस्था के साथ ही फास्टिंग रखने से शरीर को कई तरह के फायदे मिलते हैं। ये शरीर से टॉक्सिन को बाहर निकालता है और बॉडी को पूरी तरह से डिटॉक्स करता है। हालांकि, डायबिटीज पेशेंट अगर इस व्रत को रख रहे हैं तो उन्हें कुछ बातों का ख्याल रखना होगा। डाइटीशियन और न्यूट्रिशनिस्ट डॉ पूनम दुनेजा कहती हैं कि डायबिटीज वाले लोगों को नवरात्रि के व्रतों का पूरा फायदा उठाने के लिए अपने डायट प्लान को पहले से तैयार करने की जरुरत होती है। ताकी ब्लड शुगर के लेवल को सामान्य रखा जा सके।

**नवरात्रि 2022 के लिए डायबिटीज डायट**

- अपने शरीर को हाइड्रेट रखें और हर खाने के बाद 15 मिनट तक चलने की कोशिश करें।

- नवरात्रि की थाली में कॉम्पलेक्स कार्ब्स और कम कैलोरी वाले ड्रिंक और दिन भर के खाने की डिटेल रखें ताकी आप ज्यादा हैवी खाने से बचें।

- अपने खाने में लो जीआई कार्ब्स जैसे कुट्टू की रोटी शामिल करें। सब्जियों को शामिल करें और अपने सभी खावे से पहले सलाद भी शामिल करें ताकि आपके पोस्ट प्रांडियल शुगर के स्तर को नियंत्रित रखा जा सके।

- खाने के ग्लाइसेमिक लोड को कम करने के लिए गुड फैट्स को शामिल करें।

- छाछ, दही, पनीर में कम फैट वाले डेयरी प्रोटीन शामिल करें, ताकि शुगर की किसी भी तरह की क्रेविंग को खत्म किया जा सके और दिन भर आपकी ऊर्जा का लेवल फिर से सही रहे।

## नवरात्रि में प्रेग्नेंट महिलाएं ऐसे रखें व्रत
## बनी रहेगी मां और बच्चे की सेहत

आज यानी 26 सितंबर से शारदीय नवरात्रि की शुरुआत हो चुकी है। नवरात्रि के इन 9 दिनों में लोग व्रत रखकर देवी दुर्गा की उपासना करते हैं। हिंदू धर्म में नवरात्रि व्रत का बहुत बड़ा महत्व माना जाता है। यही वजह है कि कई बार गर्भवती महिलाएं भी नवरात्रि का उपवास रख लेती हैं। लेकिन गर्भावस्था के दौरान गर्भ में पल रहे बच्चे के पूर्ण विकास के लिए प्रेग्नेंट महिला को पोषण की सबसे ज्यादा आवश्यकता होती है। ऐसे में जरूरी होता है कि गर्भवती महिला अच्छी डाइट लें। अगर आप इस इस नवरात्रि प्रेग्नेंट हैं और नवरात्रि का व्रत रखने की सोच रही हैं तो जानें व्रत रखते समय आपको क्या सावधानियां बरतने की जरूरत है।



**प्रेगनेंट महिलाएं नवरात्रि व्रत के दौरान रखें इन बातों का ध्यान-**

-गर्भावस्था के दौरान अगर व्रत रख रहे हैं तो पानी का सेवन खूब करें।

-दिन के समय आराम करें।

-व्रत के दौरान अपनी डाइट को लेकर अपने डॉक्टर से जरूर सलाह लें।

-कई लोग व्रत के दौरान दवा लेने से परहेज करते हैं। लेकिन आप ऐसी गलती न करें। इस बात का अवश्य ध्यान रखें कि डॉक्टर द्वारा दी गई दवा को समय-समय पर लेती रहें। आप व्रत की वजह से अपनी दवाई नहीं खाएंगी, तो इससे गर्भावस्था में समस्याएं हो सकती हैं।

-व्रत के दौरान अच्छी नींद लें।

-शांत रहें और तनाव लेने से बचें।

**प्रेगनेंट महिलाएं नवरात्रि व्रत के दौरान क्या न करें?**

-प्रेग्नेंट महिलाएं नवरात्रि व्रत के दौरान अधिक देर तक भूखी न रहें।

-नवरात्रि व्रत के दौरान अधिक मसाले वाले खाद्य पदार्थों का सेवन करने से बचें।

-व्रत के दौरान किसी तरह की समस्या होने पर डॉक्टर के परामर्श के बिना दवा न लें।।

-गर्भावस्था के दौरान निर्जला व्रत न रखें।

-गर्भावस्था के दौरान भारी भरकम काम न करें।

-गर्भावस्था के दौरान ज्यादा देर तक खड़ा नहीं रहना चाहिए।

-अगर आप व्रत रख रही हैं तो इस समय ज्यादा मीठे खाद्य पदार्थों और कॉफी, चाय जैसे कैफीन वाले पेय पदार्थों को लेने से बचें।

## नवरात्र में बना सकते हैं ये 5 टेस्टी व्रत की रेसिपीज

